मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २९४ ■ मंगळवार, ०७ जुलै २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514




# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर रायगड प्रशासनाचे मदत व बचावकार्य युद्धपातळीवर !







## ■ 200 पेक्षा अधिक नागरिक व पर्यटकांची सुरक्षित सुटका
## ■ 14 गावांतील 937 नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी** : जिल्ह्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनासह सर्व संबंधित यंत्रणा पूर्णपणे सतर्क आणि सक्रिय असून, नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत मदत व बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. आपदा मित्र, स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवक, ट्रेकर्स, पोलीस आणि महसूल विभागाच्या प्रभावी समन्वयातून आतापर्यंत 200 पेक्षा अधिक नागरिक व पर्यटकांची सुरक्षित सुटका करण्यात यश मिळविलें आहे. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून 14गावांतील 265 कुटुंबांमधील 937 नागरिकांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस सुरू असून, दि.6जुलै रोजी सकाळी 10 वाजेपर्यंत सरासरी 236.60 मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. खालापूर तालुक्यात सर्वाधिक 323.3 मि.मी., महाडमध्ये 272.2 मि.मी. तर सुधागडमध्ये 268.2 मि.मी. पावसाची नोंद झाली. जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यांतही 150 मि.मी.पेक्षा अधिक पाऊस झाला आहे. लोणावळा येथे 625 मि.मी. तर महाबळेश्वर येथे 463मि.मी. पावसाची नोंद झाल्याने जिल्ह्यातील नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.

सकाळी 11 वाजता च्या अहवालानुसार सावित्री, अंबा आणि कुंडलिका नद्यांनी धोका पातळी ओलांडली असून, पाताळगंगा नदी धोका पातळीवरून वाहत आहे. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या आणि सखल भागातील नागरिकांना पब्लिक ॲड्रेस सिस्टीमद्वारे सातत्याने सतर्कतेच्या सूचना देण्यात येत आहेत. संभाव्य धोक्याच्या ठिकाणी प्रशासनाकडून आवश्यक खबरदारी घेण्यात येत असून नागरिकांच्या सुरक्षित स्थलांतरावर भर देण्यात आला आहे.

जिल्ह्यातील धरणांच्या पाणीसाठ्यावरही प्रशासनाचे बारकाईने लक्ष आहे. हेटवणे मध्यम प्रकल्प 53.23 टक्के भरला असून, जिल्ह्यातील 28 लघुप्रकल्पांपैकी 17 लघुप्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत. नदीपातळी, धरणांतील पाणीसाठा आणि पावसाच्या स्थितीचा संबंधित यंत्रणांकडून सातत्याने आढावा घेण्यात येत आहे.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील काही सखल भागांत पाणी साचण्याच्या घटना घडल्या आहेत. अशा ठिकाणी प्रशासनाने तत्काळ प्रतिसाद देत मदतकार्य सुरू केले. विशेषतः आपदा मित्र, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वयंसेवक, ट्रेकर्स, पोलीस आणि महसूल विभागाने समन्वयाने काम करत अडकलेल्या नागरिक व पर्यटकांना सुरक्षितस्थळी हलविण्यास प्रशासनाला यश मिळाले आहे. प्रतिकूल हवामानातही बचाव पथके कार्यरत असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे.

जिल्ह्यात 25ठिकाणी दगड-माती खाली येण्याच्या तर 73 घरांच्या परिसरात दरड कोसळल्याच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. या घटनांमध्ये तीन व्यक्ती जखमी झाल्या आहेत. रस्त्यांवर आलेल्या दरडी आणि दगड-माती तातडीने हटवून वाहतूक पूर्ववत करण्यासाठी यंत्रणांनी तत्परतेने कार्यवाही केली आहे. दरडप्रवण भागातील कुटुंबांना खबरदारीचा उपाय म्हणून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आले आहे.

अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील प्रमुख राष्ट्रीय महामार्गांवरील वाहतुकीवर काही प्रमाणात परिणाम झाला आहे. तसेच सखल भागातील काही राज्य, जिल्हा आणि गाव रस्त्यांवरून पाणी वाहत असल्याने वाहतूक प्रभावित झाली आहे. अशा ठिकाणी नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी वाहतूक पर्यायी मार्गांवरून वळविण्यात आली आहे. जिल्ह्यातील रेल्वे वाहतूकही सुरळीत सुरू आहे.

अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी जीवितहानीच्या दुर्दैवी घटनाही घडल्या आहेत.

उपलब्ध अहवालानुसार तीन व्यक्तींचा मृत्यू झाला असून, पाच व्यक्ती बेपत्ता आहेत.

पनवेल, कर्जत आणि महाड तालुक्यांतील धबधबे, तलाव, नदीकाठ तसेच अन्य ठिकाणी घडलेल्या घटनांच्या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांकडून शोधकार्य सुरू आहे. नागरिकांनी अतिवृष्टीच्या काळात धबधबे, नदीपात्र, तलाव आणि इतर धोकादायक पर्यटनस्थळी जाणे टाळावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

अतिवृष्टीमुळे पशुधनाचेही नुकसान झाले असून तीन मोठ्या जनावरांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये कर्जत तालुक्यातील एक बैल, माणगाव तालुक्यातील एक गाय आणि पेण तालुक्यातील एका गायीचा समावेश आहे. तसेच 86 कोंबड्यांची हानी झाली आहे.

प्राथमिक माहितीनुसार 84 घरांची पडझड झाली असून, 242 घरांमध्ये पाणी शिरल्याने नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त भागात पंचनामे करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. सात गोठ्यांचेही नुकसान झाले आहे. रोहा तालुक्यातील बाळसई येथील एका मंदिराचे, महाड तालुक्यातील विन्हेरे सुतारकोंड येथील एका शाळेचे तसेच 12 खासगी दुकानांचे नुकसान झाल्याची नोंद आहे. नुकसानग्रस्तांना नियमानुसार मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून आवश्यक ती कार्यवाही तातडीने सुरू करण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणा सतर्क असून जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष किशन जावळे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आचल दलाल, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदेश शिर्के, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक तसेच जिल्ह्यातील सर्व प्रांताधिकारी,तहसिलदार, सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग, महावितरण यांच्यासह विविध शासकीय यंत्रणांचे वरिष्ठ व क्षेत्रीय अधिकारी परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहेत.

नियंत्रण कक्ष आणि क्षेत्रीय यंत्रणांमध्ये समन्वय ठेवण्यात आला असून, नागरिकांकडून मिळणाऱ्या माहितीवर तातडीने कार्यवाही करण्यात येत आहे.

नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, प्रशासनाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे आणि नदी, नाले, धबधबे, पूल व पाणी साचलेल्या रस्त्यांवरून प्रवास करण्याचे टाळावे, झाडाखाली उभे राहणे, खरोखरच गरज असेल तेव्हाच घराबाहेर पडावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून प्रसारमाध्यमे, सोशल मीडियाच्या माध्यमातून वारंवार करण्यात येत आहे.




# वाढदिवसानिमित्त समाजसेवेचा संकल्प

## आ. विक्रांत पाटील यांनी वृद्धांना दिला आधार, आदिवासी बांधवांना मदतीचा हात

## ■ सहयोग वृद्धाश्रमात स्टील थर्मास, आदिवासी व कातकरी बांधवांना छत्री-रेनकोट वाटप
## ■ "जनतेची सेवा हाच माझा वाढदिवस" असा दिला संदेश

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (प्रतिनिधी)** : विधान परिषदेचे आमदार विक्रांत पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा, सत्कार आणि जल्लोषापेक्षा समाजातील गरजू, वंचित आणि ज्येष्ठ नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याला प्राधान्य देत माणुसकीचा आदर्श घालून दिला. देहरंगगाव येथील सहयोग वृद्धाश्रमात ज्येष्ठ नागरिकांसाठी तसेच आदिवासी व कातकरी बांधवांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस सामाजिक बांधिलकीच्या भावनेत साजरा करण्यात आला.

या उपक्रमात सहयोग वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना स्टीलचे थर्मास भेट देण्यात आले. तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर आदिवासी व कातकरी पाड्यांतील बांधवांना छत्री आणि रेनकोट वाटप करून त्यांच्या दैनंदिन जीवनात छोटासा आधार देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमामुळे वृद्धांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले, तर गरजू कुटुंबांनाही दिलासा मिळाला.







यावेळी आमदार विक्रांत पाटील यांनी आदिवासी भगिनींशी मनमोकळा संवाद साधत त्यांच्या समस्या, अडचणी आणि अपेक्षा जाणून घेतल्या. आदिवासी समाज हा "जल, जंगल आणि जमिनीचा खरा रक्षक" असून त्यांच्या हक्कांचे संरक्षण, मूलभूत सुविधा आणि सर्वांगीण विकासाला प्राधान्य देणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांच्या सन्मान, सुरक्षितता आणि त्यांच्या प्रश्नांच्या तातडीने निराकरणासाठी आपण कायम कटिबद्ध राहू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. कार्यक्रमादरम्यान चिमुकल्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या निरागस हास्याने आणि कलागुणांनी कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. या मुलांमध्येच समाजाचे उज्ज्वल भविष्य दडले असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी बोलताना आमदार विक्रांत पाटील म्हणाले, "राजकारण म्हणजे केवळ सत्ता नव्हे, तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास, विश्वास आणि माणुसकी पोहोचवण्याची जबाबदारी आहे. जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद हेच माझे खरे बळ असून सर्वसामान्यांच्या सेवेसाठी माझी वाटचाल अशीच अविरत सुरू राहील."

या समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन युवा महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अभिषेक देशमुख, रणजित देशमुख, विश्वकांत लोकरे, माणिक पंडित, विकास जाधव, कृष्णा वाघ, शर्मिला वाघ तसेच युवा महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या सर्व सहकाऱ्यांचे विशेष योगदान लाभले.

# केनडियर चे विरार मध्ये नवीन स्टोअर

## महाराष्ट्रातील रिटेल उपस्थिती केली आणखी मजबूत ब्रँडचे हे १२५ वे स्टोअर

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विरार :** कल्याण ज्वेलर्सचा प्रसिद्ध ब्रँड 'केनडियर बाय कल्याण' आपल्या आधुनिक आणि ट्रेंडी डिझाईन्ससाठी ओळखला जातो. आता केनडियरने महाराष्ट्रातील विरारमध्ये आपले नवीन आलिशान स्टोअर सुरू केले आहे. विरार वेस्ट येथील टर्नर रोडवर असलेले हे आऊटलेट या ब्रँडचे देशभरातील १२५ वे स्टोअर आहे. आजच्या आधुनिक ग्राहकांपर्यंत स्टायलिश, ट्रेंडी आणि मौल्यवान दागिने पोहोचवण्याचे आपले वचन पूर्ण करण्यासाठी ब्रँडने हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे.

विरारमधील केनडियर बाय कल्याणचे हे नवीन स्टोअर महाराष्ट्रातील रिटेल विस्ताराच्या प्रवासातील एक मोठा टप्पा आहे. विरार हे मुंबई महानगर क्षेत्रातील एक प्रमुख निवासी आणि व्यावसायिक केंद्र आहे. त्यामुळे येथे आपली उपस्थिती मजबूत करण्यासाठी हे स्टोअर एक सुवर्णसंधी आहे. रोजच्या रोज सहज वापरता येतील असे, स्वतःची वेगळी ओळख जपणारे आणि भेट देण्यासाठी आधुनिक व सुंदर दागिन्यांच्या शोधात असणाऱ्या पारखी ग्राहकांशी थेट जोडले जाण्यासाठी हे स्टोअर अत्यंत उपयुक्त ठरेल.



केनडियर बाय कल्याण हा ब्रँड वजनाने हलक्या व बहुउपयोगी दागिन्यांसाठी प्रसिद्ध आहे. हे दागिने आजची जेन-झी, नोकरदार वर्ग आणि फॅशनबद्दल जागरूक असणाऱ्या तरुणांची पहिली पसंती आहेत. आधुनिक आणि ट्रेंडी डिझाईन्स सादर करून, ब्रँडने ग्राहकांना लहान-मोठ्या प्रसंगी आपली अनोखी शैली आत्मविश्वासाने सादर करण्याची उत्तम संधी दिली आहे.

विरारमधील हे स्टोअर डिजिटल सुविधा आणि खरेदीच्या उत्तम अनुभवाचा एक अप्रतिम संगम आहे. हे स्टोअर केनडियरच्या ओम्नीचॅनल दृष्टिकोनाला अगदी योग्य सिद्ध करते. या ब्रँडला कल्याण ज्वेलर्सचा समृद्ध वारसा आणि अतूट विश्वासाची साथ लाभली आहे. केनडियर आपल्या ग्राहकांचा दागिने खरेदीचा प्रवास अधिक पारदर्शक, सोपा आणि पूर्णपणे ग्राहक-केंद्रित बनवून सातत्याने एक नवीन आणि उत्कृष्ट अनुभव देत आहे.

# शालेय शैक्षणिक साहित्य वाटप करून ग्रामपंचायत सदस्या मालती पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा







**दैनिक युवक आधार**

**मच्छिंद्र पाटील पनवेल तालुका प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील दिघाटी गावच्या ग्रामपंचायत सदस्या मालती सुरेश पाटील यांचा वाढदिवस सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रमाने उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला.

वाढदिवसाला अनावश्यक खर्च करण्याऐवजी विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी उपयोगी पडणारे शालेय साहित्य वाटप करण्याचा उपक्रम राबविण्यात आल्याने उपस्थित मान्यवरांनी मालती पाटील यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन मिळणार असून समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श निर्माण झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमास प्रीतमदादा म्हात्रे (माजी विरोधी पक्षनेते, पनवेल महानगरपालिका), जीवनदादा म्हात्रे (माजी उपसभापती, पनवेल पंचायत समिती), संतोष पाटील (माजी सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती पनवेल), दत्ताशेठ पाटील (ज्येष्ठ नेते, भाजपा), दशरथ पाटील (नेते, भाजपा), सुरेश पाटील (युवा नेते), अमित पाटील (माजी सरपंच तथा सदस्य, ग्रामपंचायत दिघाटी), शितल पाटील (उपसरपंच, ग्रामपंचायत दिघाटी), नयना म्हात्रे (सदस्या, ग्रामपंचायत दिघाटी), विकास पाटील (अध्यक्ष, स्कूल कमिटी दिघाटी), रामभाऊ पाटील (नेते, भाजपा), भावेश ठाकूर (युवा नेते), तेजस म्हात्रे (युवा नेते, भाजपा), ज्योती कोंडवलकर (ग्रामसेविका), मच्छिंद्र पाटील (ज्येष्ठ नेते), ललिता कमलाकर ठाकूर (स्कूल कमिटी सदस्या) तसेच जागृती मनोज ठाकूर यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी मालती सुरेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात आलेला हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असून भविष्यातही अशाच समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून कार्य सुरू राहावे, अशा शुभेच्छा मान्यवरांनी दिल्या.

कार्यक्रम उत्साही आणि आनंदमय वातावरणात पार पडला. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला, तर ग्रामस्थांनीही या अभिनव वाढदिवस उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

# १०७ वर्षांची ज्ञानपरंपरा ! श्री माणकेश्वर वाचनालयाचा वर्धापन दिन ९ जुलैला उत्साहातया

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड शहरासह परिसरात शतकाहून अधिक काळ वाचन संस्कृतीची अखंड जोपासना करणाऱ्या तसेच केंद्र शासनाचा प्रतिष्ठेचा राजाराम मोहन रॉय पुरस्कार प्राप्त श्री माणकेश्वर वाचनालयाचा १०७ वा वर्धापन दिन बुधवार, दि. ९ जुलै रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.




वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर शेलार व सहचिटणीस राहुल दवते यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, वाचनालयाची ज्ञानपरंपरा आणि सामाजिक बांधिलकी जपत हा वर्धापन दिन दरवर्षी उत्साहात साजरा केला जातो. यंदाही सभासद, वाचक आणि मान्यवरांच्या उपस्थितीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता श्री माणकेश्वर वाचनालयाच्या सभागृहात सत्यनारायण महापूजेने होणार आहे. ही महापूजा वाचनालयाचे स्वीकृत संचालक श्याम गोळे व सौ. सोनाली गोळे यांच्या हस्ते संपन्न होईल.

त्यानंतर वाचनालयाचे संस्थापक कै. नानासाहेब गाडगीळ, कै. भाऊसाहेब उगावकर आणि कै. विष्णुपंत सोनवणी यांच्या प्रतिमांचे पूजन निफाड नगरपंचायतीचे नगरसेवक साहेबराव बर्डे व नगरसेवक बंटी (संदीप) शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस तथा पक्षीमित्र दत्तात्रय उगावकर, संचालक तनवीर राजे, सुहास सुरळीकर, ग्रंथमित्र नईमखान पठाण, राजेंद्र खालकर, सुनील चिखले, बाळासाहेब कर्डिले, डॉ. महेश बनकर, संचालिका सुजाता तनपुरे, स्वीकृत संचालक गुलाब टकले, डॉ. अरुण कातकाडे, शामराव गोळे, ग्रंथपाल नितीन बनसोडे यांच्यासह वाचनालयाचे सभासद, वाचक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.शतकाहून अधिक काळ ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या श्री माणकेश्वर वाचनालयाने निफाडमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यात मोलाचे योगदान दिले आहे. या वर्धापन दिनानिमित्त वाचनप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन वाचनालयाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# रोटरी क्लब पनवेल सेंटर च्या अध्यक्षपदी दिपक गडगे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल सुरुची ब्लॅंकेट हॉल येथे शनिवार दिनांक ४ जुलै रोजी रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या अध्यक्षपदाचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या सन २०२६-२७ या वर्षासाठी अध्यक्ष पदभार रोटेरियन दीपक गडगे यांना दिला तर सचिवपदाची सूत्रे रोटेरियन ऋषिकेश बुवा यांनी स्वीकारली. तसेच नव्या संचालक मंडळाने (BOD Team) देखील आपल्या पदाची जबाबदारी स्वीकारली.

या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून DGN विवेक दीक्षित उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून रोटरीच्या सेवाकार्यात नेतृत्व, समर्पण आणि समाजहिताची भावना जोपासण्याचा संदेश दिला. कार्यक्रमाचे मान्यवर अतिथी PDG डॉ. गिरीश गुणे यांनी नव्या पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत आगामी वर्षासाठी विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन PE आरती खेर यांनी केले. त्यांच्या ओघवत्या निवेदनामुळे संपूर्ण कार्यक्रम अधिक आकर्षक झाला.या



पदग्रहण सोहळयास असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन शिरीष नांदेडकर,माजी विरोधीपक्ष नेते प्रितम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू आणि अनेक प्रतिष्ठित नागरिक, विविध सामाजिक संस्थांचे पदाधिकारी, उद्योजक, मान्यवर पाहुणे तसेच रोटरी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी नव्या अध्यक्ष, सचिव व संचालक मंडळाला शुभेच्छा देत आगामी वर्षात क्लबकडून समाजहिताचे अनेक उपक्रम राबविले जातील, असा विश्वास व्यक्त केला.यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष दिपक गाडगे यांनी आपली संकल्पना मंडत मागील वर्षची अपुरी कामे पूर्ण कारणात असल्याचे आश्वासन दिले.डॉ गिरीश गुणे यांनी या क्लब ला लागली ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

# पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'अ' (खारघर) मधील प्रशासनाच्या गंभीर प्रश्नाबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने उठविला आवाज

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'अ' (खारघर) येथील प्रभाग अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. नागरिकांच्या तक्रारींना वेळेवर प्रतिसाद मिळत नाही, फोन उचलले जात नाहीत आणि अनेक प्रश्न प्रलंबितच राहतात. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या संदर्भात खारघर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपशहरप्रमुख नंदु वारुगसे यांनी आवाज उठवून भोंगळ कारभाराचा तीव्र संताप व्यक्त केला आहे.

यावेळी बोलताना उपशहरप्रमुख नंदु वारुगसे यांनी जर संबंधित अधिकारी आपल्या जबाबदाऱ्या प्रभावीपणे पार पाडत नसतील, तर त्यांच्या कामकाजाचे वरिष्ठ स्तरावर तातडीने परीक्षण करून



आवश्यक प्रशासकीय निर्णय घ्यावेत. नागरिकांना उत्तरदायी आणि कार्यक्षम प्रशासन मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. प्रभाग समिती 'अ' मध्ये कार्यक्षम, उत्तरदायी आणि नागरिकाभिमुख प्रशासन तातडीने उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी सुद्धा पनवेल महानगरपालिकेकडे केली आहे.

# मराठा गौरव आदरणीय श्री.युवराज (भाऊ) काशिद यांच्या हस्ते सारोळा शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान...!

**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार :** शनिवार दिनांक ४ जुलै २०२६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सारोळा येथील इयत्ता आठवी शिष्यवृत्ती धारक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा मराठा गौरव सन्माननीय युवराज (भाऊ) काशिद ,सरपंच अजय (दादा)काशिद,मकरंद (आबा) काशिद, केंद्रप्रमुख माजिद शेख साहेब यांच्या उपस्थिती मध्ये संपन्न झाला.

यावेळी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षा सन २०२६ मध्ये जिल्हा गुणवत्ता शिष्यवृत्ती धारक होण्याचा बहुमान संपादन करणारे सारोळा शाळेचे गुणवंत विद्यार्थी साक्षी गोवर्धन मुळे, पूनम राम जगदाळे व पवन दादासाहेब जगदाळे यांचा त्यांच्या पालक समवेत उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या सुयशामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रतिवर्ष ७५००/- रू




याप्रमाणे एकूण १५०००/- रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे.

इयत्ता ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र 1३ विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक तसेच NMMS परीक्षेत पात्र ११ विद्यार्थ्यांपैकी १ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाल्याबद्दल इयत्ता आठवीचे वर्गशिक्षक राहुल लिमकर तसेच इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षेत १५ विद्यार्थी पात्र झाल्याबद्दल इयत्ता पाचवीच्या वर्गशिक्षिका अमृता रसाळ यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.सारोळा शाळेचे माजी मुख्याध्यापक तथा राजुरी केंद्राचे नूतन केंद्रप्रमुख माजीद शेख साहेब यांचाही सपत्नीक सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. एकंदरीत सारोळा शाळेच्या उत्कृष्ट शिष्यवृत्ती गुणवत्ता पॅटर्नचे उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा करत सर्व शिक्षक व विद्यार्थी यांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रम प्रसंगी मराठा गौरव आदरणीय युवराज (भाऊ) काशिद,सरपंच अजय (दादा ) काशिद,मकरंद (आबा) काशिद , केंद्रप्रमुख माजीद शेख साहेब,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सतीश मुळे, पालक गोवर्धन मुळे,राम जगदाळे ,दादासाहेब जगदाळे,अंगद चव्हाण,शाळेचे मुख्याध्यापक संदिप भालसिंग,पदवीधर शिक्षक सुरेश बर्वे ,श्री.राहुल लिमकर, उपाध्यापक श्री. प्रशांत होळकर ,उपाध्यापिका शबाना शेख ,वृषाली खांदवे व अमृता रसाळ व सर्व विद्यार्थी उपस्थित होते...!

# प्रचंड पावसामुळे खांदा कॉलनीत जीर्ण झाडे धोकादायक अवस्थेत पनवेल महापालिकेचे दुर्लक्ष

## खांदा कॉलनीत भर रस्त्यात झाढ पडल्याने वाहतूक कोंडी

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** खांदा कॉलनीत जीर्ण अवस्थेत अनेक झाडे आहेत हि झाडे धोकादायक स्थितीत आहेत ती पडल्याने कोणताही अपघात होऊ शकतो शिवाय जीवीत हानी होऊ शकते असे असताना असे असताना पनवेल महापालिका याकडे दुर्लक्ष करत आहे

गेले दोन दिवस प्रंचड पाऊस पडत असल्याने खांदा कॉलनीत सेक्टर 9 परिसरातील एक जुने झाड पडल्याने



परिसरात वाहतूक कोंडी झाली हे भले मोठे झाड बाजूला करताना प्रशासनाची तारांबळ उडाली शेवटी कंटीग करुन हे झाड बाजूला करण्यात आले

बाजूला बिल्डींग व कार पार्किंग असतात पण सुदैवाने झाड रस्त्यावर पडल्याने कोणतीही जीवीत हानी झाली नाही परंतु या परिसरातील नागरिकांनी मात्र पनवेल महापालिका प्रशासनाना विरूद्ध नाराजी व्यक्त केली

अनेक वेळा तक्रारी करून सुद्धा पनवेल महापालिका या परिसरातील जीर्ण झाडे तोडत नाही वृक्षसविधन समितीने तात्काळ यावर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

# पाण्याच्या प्रवाहात एक जण गेला वाहून, दुसऱ्याचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील वाघाची वाडी जवळील नदीत पोहत असताना पाण्याच्या प्रवाहात एक जण वाहून गेला तर दुसऱ्याचा मृत्यू झाला. मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव सुमित यशवंत पवार (वय 26 राहणार विचुंबे) असे आहे तर वाहून गेलेल्या तरुणाचे नाव नयन म्हात्रे (राहणार विचुंबे) असे आहे. रात्री उशिरा पर्यंत पोलीस त्याचा शोध घेत होते.

5 जुलै रोजी सुमित पवार, नयन म्हात्रे आणि इतर आठ जण हे पृथ्वी फार्म हाऊसच्या बाजूला वाघाची वाडी नदी, धोदाणी गाव येथे फिरण्यासाठी गेले होते. यावेळी नदीपात्रात त्यांचे इतर



मित्र सुमित पवार आणि नयन म्हात्रे हे पोहत असताना नदीच्या प्रवाहात नयन म्हात्रे हा भवऱ्यामध्ये अडकला. यावेळी सुमित पवार हा त्याला वाचवण्यासाठी गेला असता तो देखील नदीच्या पाण्यातील भवऱ्यामध्ये अडकला. मुसळधार पाऊस कोसळत असल्याने पाण्याचा प्रवाहाचा वेग जास्त होता. त्यामुळे नयन म्हात्रे हा पाण्यामध्ये वाहून गेला. त्यानंतर त्यांचे मित्रांनी नदीपात्रात उतरून पाण्यामध्ये वाहून जाणाऱ्या सुमित पवार याला पकडले आणि नदीच्या बाहेर आणले. यावेळी त्याच्या नाका- तोंडात पाणी गेले असल्याने त्याला श्वास घेण्यास त्रास होत होता. त्याला खाजगी कारने उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंदा कांबळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदा हरगुडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुभाष डीगे, पोलीस उपनिरीक्षक दीपक शेळके घटनास्थळी दाखल झाले. वाहून गेलेल्या नयन म्हात्रे याचा शोध घेतला जात आहे.

# पेण येथे भर पावसात कोमसापचे बहारदार काव्य संमेलन

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी / सागर घरत** : पेण येथील कोकण मराठी साहित्य परिषद शाखा पेण आणि काव्यप्रेमी मंच पेण ( साई तलाव कवी कट्टा) यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार ५ जुलै रोजी गांधी मंदिर पेण येथे राज्यस्तरीय काव्य संमेलन संपन्न झाले.

संततधार पाऊस असतांनाही जिल्ह्यातील विविध ठिकाणातील कवींनी भाग घेऊन हा कार्यक्रम मोठ्या उपस्थितीत अतिशय सुरेख झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्य रत्न रायगड भूषण प्रा.एल. बी.पाटील, रायगड भूषण म.वा.म्हात्रे, शिक्षणाधिकारी पी.डी.पाटील, शाखाध्यक्ष लवेंद्र मोकल, ज्येष्ठ साहित्यिक चंद्रकांत पाटील, एन.जे.पाटील साईकट्टा, एस. एस.पाटील. कोमसाप,साईकट्टा,अजय शिवकर,दिनानाथ पाटील, विलास पुंदले, इत्यादी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.देवानंद बामणे यांच्या प्रभास या प्रकाशन संस्था आणि दीपक गावंड यांच्या निसर्ग गीते आणि शिवाज्ञा आरती यांचे प्रकाशन साहित्य रत्न प्रा.एल.बी.यांच्या शुभहस्ते झाले.प्रास्ताविक एस.एस. पाटील



आभार प्रदर्शन लवेंद्र मोकल, स्वागत गीत सुनिता मोरेआणि सूत्रसंचालन अनिल थवई यांनी केले.

यावेळी झालेल्या कविसंमेलनात अक्षता गोसावी,न.ग.पाटील, मनोज पाटील,मोहनलाल पाटील, जगन्नाथ जांभळे, प्रकाश पाटील,विशाखा भगत, बाळाराम म्हात्रे,रेखा तळे, डॉ.सायली गोडबोले,अनंत मोकल,तुळशीदास पाटील, अनंता मोकल,माधवी मोतिलिंगे करुणाकर पाटील,शालिनी ठाकूर ,मान्यवर अतिथी इत्यादी ५९ कवींनी कविता सादर केल्या.

# सिंधू महाकुंभाच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या संदेशाचे महाराष्ट्रात स्वागत व्हावे – विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : लडाख येथे आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक प्रथम सिंधू महाकुंभ मेळयाबाबत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते दयानंद सावंत यांनी लिहिलेला लेख दैनिक युवक आधार आणि तरुण भारत या वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झाला होता. या लेखाचे संकलन विधानसभा उपाध्यक्ष मा. ना. श्री. अण्णा बनसोडे यांचे जुने सहकारी श्री. संतोष निंबरे यांनी केले होते.

तीस वर्षांच्या अखंड सिंधू यात्रेचे प्रथमच सिंधू महाकुंभ मेळयात झालेले रूपांतर आणि त्या महाकुंभात बौद्ध लामा अध्यात्मिक गुरू पाल्गा रिंपोचे यांच्या हस्ते संपन्न झालेले सिंधू पूजन ही विशेष उल्लेखनीय बाब असल्याचे या लेखातून अधोरेखित करण्यात आले होते. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य इंद्रेश कुमार यांच्या दीर्घकालीन प्रयत्नांमुळे राष्ट्रीय एकात्मता, सद्भावना आणि सर्व पंथ समभावाचे साक्षात दर्शन



या महाकुंभ मेळयात घडल्याचेही नमूद करण्यात आले होते.

हा लेख वाचल्यानंतर मा. ना. श्री. अण्णा बनसोडे यांनी श्री. संतोष निंबरे यांना दयानंद सावंत यांची भेट घडवून आणण्यास सांगितले. त्यानुसार झालेल्या या भेटीत सिंधू महाकुंभ मेळयाचे महत्त्व, भारतीय संस्कृतीची विविधता आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेवर सविस्तर चर्चा झाली.

यावेळी मा. अण्णा बनसोडे यांनी



काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत तसेच पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत असलेल्या विविध संस्कृती, परंपरा आणि अध्यात्मिक विचारांचा संगम महाराष्ट्राच्या संतभूमीतही घडावा, अशी इच्छा व्यक्त केली. राष्ट्रीय समरसता, सामाजिक ऐक्य आणि भारतीय सांस्कृतिक वारशाचे जतन करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.दयानंद सावंत यांनीही सिंधू महाकुंभाच्या माध्यमातून संपूर्ण देशाला एकात्मतेचा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश मिळत असल्याचे सांगितले. तथागत गौतम बुद्ध आणि भारतीय ऋषी परंपरेने दिलेला मानवकल्याणाचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.


दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले, सहसंपादक मुकुंद कांबळे तसेच महाराष्ट्र संपादक अजय कापरे यांनी भविष्यात अशा राष्ट्रीय एकात्मतेच्या आणि भारतीय संस्कृतीच्या जतनासाठी आयोजित कार्यक्रमांमध्ये मिडिया पार्टनर म्हणून सक्रिय सहकार्य करण्याची भावना दयानंद सावंत यांच्याकडे व्यक्त केली.

भारतीय संस्कृतीतील विविधतेत एकता, सर्वधर्म समभाव आणि राष्ट्रीय समरसतेचा संदेश देणाऱ्या सिंधू महाकुंभासारख्या उपक्रमांची माहिती महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचावी आणि संतांच्या भूमीतही अशा सांस्कृतिक संगमाचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# वालूरकर दिंडी आळंदीकडे रवाना; १६५ वर्षांची परंपरा अखंड

**दैनिक युवक आधार**

**सेलू / प्रतिनिधी शिवाजी पवार** : तालुक्यातील श्रीक्षेत्र वालूर येथील वै. ह. भ. प. अण्णासाहेब महाराज व वै. ह. भ. प. बापूसाहेब महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरीची वारी करणारी वालूरकर दिंडी आषाढी वारीसाठी मोठ्या उत्साहात रवाना झाली. कैवल्यचक्रवर्ती, ज्ञानियांचे राजे व साधकांचे मायबाप संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळयात माउलींच्या रथामागे १५ क्रमांकाचा मान असलेल्या या दिंडीचे हरीनामाच्या गजरात वै. ह. भ. प. अण्णासाहेब महाराज यांच्या समाधीस्थानाहून दि. ४



जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले. यंदा या परंपरेचे १६५ वे वर्ष असून, सध्या दिंडीचे नेतृत्व ह. भ. प. पुरुषोत्तम महाराज वालूरकर करत आहेत.जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या 'पंढरीची वारी आहे माझे घरी, आणिक न करी तीर्थव्रत' या अभंगातील वचनाप्रमाणे आराध्य दैवत भगवान श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी असंख्य वारकरी, वैष्णव व भाविक भक्त आषाढी वारीत सहभागी होत आहेत. ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता वारकरी विठ्ठलनामाच्या गजरात भूवैकुंठ पंढरीकडे मार्गस्थ झाले आहेत.वालूरकर दिंडीचा पंढरपूर येथे स्वतंत्र मठ आहे. तसेच या दिंडीला माउलींच्या पालखी सोहळयात मानाचे स्थान लाभले आहे. मंगळवार, दि. ७ जुलै रोजी श्रीक्षेत्र आळंदी येथे माउलींच्या मंदिरात, तर रविवार, दि. १२ जुलै रोजी श्रीक्षेत्र सासवड येथे माउलींच्या पालखीसमोर मानाचे कीर्तन करण्याची परंपरा अखंडपणे सुरू असल्याचे दिंडीतील वारकऱ्यांनी सांगितले.वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा जपत वालूरकर दिंडी गेल्या दीडशेहून अधिक वर्षांपासून भक्ती, नामस्मरण आणि समाजप्रबोधनाचा संदेश देत पंढरीच्या वाटेवर अविरतपणे वाटचाल करत आहे.

# पनवेल परिसरातील मोरबे धरण ओव्हरफलो

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : पनवेल तालुक्यातील मोरबे धरण ओव्हरफ्लो झाले असून भिंतीवरून पाणी जात आहे. जवळपास 50 एकर जमिनीवर वसलेले मोरबे धरणाचे पाणी आजूबाजूच्या गावातील शेतीसाठी तसेच काही गावांना पिण्यासाठी वापरला जातो.

यावर्षी जून महिन्यात पाऊस न झाल्याने जुलै महिन्यात पाऊस धो धो बरसत आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यातील मोरबे धरण



ओव्हरफलो झाले आहे. 3.22 दशलक्ष घनमीटर या धरणाची क्षमता असून 3.12 दशलक्ष घनमीटर उपयुक्त पाणीसाठा असतो. मुसळधार पाऊस कोसळत असल्याने मोरबे धरण ओव्हरफलो झाले आहे.

# जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने ओमकार साई बालसंगोपन केद्रांतील मुलींना खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**डोंबिवली प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर** : जनजागृती सेवा संस्थेचा शैक्षणिक उपक्रम म्हणून डोंबिवली येथील ओमकार साई बालसंगोपन केद्रांतील मुलींना खाऊ व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.यामध्ये प्लास्टिक फोल्डर,पेन, पेन्सिल,खोड रबर,शार्पनर, पेन्सिल,फुलस्केप पेपर, प्रत्येकी अर्धा डझन फुल साईज वह्या,लेडीज रुमाल,वॉटर बॅग अशा स्वरूपाचे शैक्षणिक साहित्य संस्थेचे पदाधिकारी आत्माराम नाटेकर,सह खजिनदार श्रुती सतीश उरणकर, चंद्रकला मानकर, संस्थेचे जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे, लोकसेवा समितीचे सचिव चारुदत्त राणे यांच्या हस्ते देण्यात आले.संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रास्ताविक केले.या उपक्रमासाठी लोकसेवा समितीचे सहकार्य लाभले.



यावेळी कार्यकारिणी सदस्य आत्माराम नाटेकर आणि जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांनी मनोगत व्यक्त केले.उपक्रम संकल्पना व विशेष सहकार्य जेष्ठ सल्लागार अरविंद सुर्वे यांचे लाभले.ओमकार साई बालसंगोपन केंद्राच्या अध्यक्षा सुविधा दांडेकर यांनी संगोपन केंद्राच्या कार्याची माहिती दिली.

# पनवेल पालिकेच्या कंत्राटी कामगारांना दिलासा; समस्या सोडवण्याचे परिषदेत कामगार मंत्र्यांचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिकेत अनेक वर्षांपासून कंत्राटी पद्धतीवर कार्यरत असलेल्या अभियंते व कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा, तसेच त्यांच्या सेवेला योग्य मान्यता देण्यात यावी, अशी जोरदार मागणी आमदार विक्रांत पाटील यांनी विधान परिषदेत उपस्थित केली. कोरोना महामारीच्या कठीण काळात जीवाची पर्वा न करता सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अनुभवाचा योग्य सन्मान होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सभागृहात ठामपणे मांडले.

पनवेल महापालिकेचा आकृतीबंध मंजूर होण्यापूर्वी नियुक्त झालेल्या कंत्राटी अभियंते व कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी भरती प्रक्रियेत कोणतीही विशेष सवलत न देता नियमित परीक्षेची अट घालण्यात आली आहे. अनेक वर्षांचा अनुभव आणि संकटकाळातील योगदान लक्षात घेऊन नवी मुंबई महापालिकेच्या धर्तीवर या कर्मचाऱ्यांना ठोक मानधनावर सेवेत सामावून घेण्याचा निर्णय शासनाने घ्यावा, अशी मागणी विक्रांत पाटील यांनी केली. यामुळे अनुभवी मनुष्यबळ टिकून राहून महापालिकेच्या कामकाजाला गती मिळेल,




असेही त्यांनी नमूद केले.

याचबरोबर त्यांनी कंत्राटी कामगारांच्या वेतन, भविष्य निर्वाह निधी (पीएफ) आणि इतर सेवा सुविधांमधील अनियमिततेचाही मुद्दा उपस्थित केला. ठेकेदारांना मंजूर करण्यात आलेल्या दरापेक्षा कमी वेतन दिले जात असून अनेक ठिकाणी पीएफची रक्कम नियमित जमा केली जात नसल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला. पनवेल महापालिकेतील कंत्राटी कामगारांच्या देणी, पीएफ आणि इतर हक्कांबाबत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

यावर उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आमदार विक्रांत पाटील यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाची गंभीर दखल घेत तात्काळ पनवेल महापालिकेच्या अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात येतील, असे आश्वासन दिले. कंत्राटी कामगारांची प्रलंबित देणी, वेतन व पीएफसह इतर प्रश्नांची तपासणी करून कामगारांची पिळवणूक करणाऱ्या ठेकेदारांवर तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले जातील, अशी ग्वाही त्यांनी सभागृहात दिली.

# वेश्याव्यवसायातून अल्पवयीनसह दोन पीडित मुलींची सुटका; नवी मुंबई गुन्हे शाखेची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : नवी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने मानवी तस्करी आणि वेश्याव्यवसायाविरोधात मोठी कारवाई करत एका अल्पवयीन मुलीसह दोन पीडित मुलींची सुटका केली. या प्रकरणी एका महिलेला अटक करण्यात आली असून तिच्याविरोधात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहआयुक्त दिपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) प्रमोद शेवाळे आणि पोलीस उपायुक्त (गुन्हे शाखा) सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने ही कारवाई केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक




गजानन कदम यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, नवी मुंबई परिसरात गौतम नावाचा इसम १६ ते १७ वर्षांच्या मुलींसह महिलांना ग्राहकांकडे वेश्याव्यवसायासाठी पाठवत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून सापळा रचला. संपर्क साधल्यानंतर आरोपीने मुलींना प्लॉट क्रमांक २, सेक्टर १९-ए, वाशी येथे आणले. त्यावेळी पोलिसांच्या पथकाने छापा टाकून रेखा रंजन मजूमदार (वय ३८) हिला ताब्यात घेतले. प्राथमिक तपासात तिने पश्चिम बंगालमधील एका अल्पवयीन व दोन पीडित मुलींना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वेश्याव्यवसायात ढकलल्याचे निष्पन्न झाले. तसेच पीडित मुलींचे फोटो ग्राहकांना पाठवून त्यांच्याकडून ६ हजार रुपये स्वीकारल्याचेही तपासात समोर आले. या प्रकरणी संबंधित आरोपीविरुद्ध एनपीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १४३(३) तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा आणि पोक्सो कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने तिला ७ जुलै २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस आयुक्त धर्मपाल बसाडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन कदम, सहायक पोलीस निरीक्षक योगेश देशमुख, पोलीस हवालदार सविता म्हात्रे, ज्योती अडकमोल, पावडे, चालक पोलीस हवालदार मोहिते, पोलीस शिपाई ठाकूर, चव्हाण, कोलते आणि पाटील यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, पोखर्णी नांदेड येथे "कृषी दिन" उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नांदेड, प्रतिनिधी :** महात्मा गांधी कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, पोखर्णी (ता. नांदेड) येथे हरीत क्रांतीचे जनक तथा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त 'कृषी दिन' विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे संचालक डॉ. एस. डी. मोरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णीचे शास्त्रज्ञ डॉ. एम. जी. कल्याणकर उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. ए. सोनवणे व प्राध्यापक डॉ. पी. यू. ढोणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. एस. डी. मोरे यांनी वसंतराव नाईक यांच्या कृषी क्षेत्रातील ऐतिहासिक योगदानाचा गौरव करत







विद्यार्थ्यांना कृषी दिनाचे महत्त्व, आधुनिक शेतीतील तंत्रज्ञानाचा वापर आणि पर्यावरण संवर्धनाची गरज याविषयी मार्गदर्शन केले.

प्रमुख पाहुणे डॉ. एम. जी. कल्याणकर यांनी वसंतराव नाईक यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे राज्याच्या कृषी विकासाला मिळालेली चालना आणि त्यांच्या कार्याचा आजच्या शेती क्षेत्रावर झालेला सकारात्मक प्रभाव यावर सविस्तर प्रकाश टाकला. प्राचार्य डॉ. पी. ए. सोनवणे यांनी विद्यार्थ्यांनी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार करून कृषी क्षेत्रात नव्या संधी निर्माण करण्याचे आवाहन केले.

यावेळी कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी येथील शास्त्रज्ञ प्रा. पवळे मॅडम व डॉ. क्षत्रिय मॅडम यांनी विद्यार्थ्यांना विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही वसंतराव नाईक यांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त करून त्यांना अभिवादन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वाय. एम. नादरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. पी. यू. ढोणे यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डी. एस. एंगडे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री. जी. एस. कदम व श्री. आर. एन. मोरे यांनी विशेष परिश्रम घेतले.याप्रसंगी महाविद्यालय व कृषि विज्ञान केंद्रातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरकुल लाभार्थ्यांच्या प्रश्नावरून अखेर सात दिवसानंतर उपोषणाची सांगता

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहुर गड:प्रतिनिधी : सय्यद इसा** : माहूर शहरातील घरकुल लाभार्थ्यांच्या प्रश्नावरून नगरपंचायत समोर सुरू असलेले उपोषण सातव्या दिवशी मुख्याधिकाऱ्यांनी मुंबईला जाऊन रक्कम आणावी या अटीवर समाप्त करण्यात आले सहाव्या दिवशी तहसीलदार मुख्याधिकारी पोलीस निरीक्षक यांनी उपोषण मंडपात भेट दिली असता उपोषणार्थी घरकुल लाभार्थी महिलांनी अक्षरश रडूनच व्यथा मांडल्याने घरकुल लाभार्थ्यांची परिस्थिती अत्यंत बिकट असल्याची जाणीव तहसीलदार अभिजीत जगताप मुख्याधिकारी विवेक कांदे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांना झाल्याने त्यांनाही काही बोलता आले नाही लाभार्थ्यांना पैसे देता येत नसल्याने तहसीलदार मुख्याधिकारी पोलीस निरीक्षक हतबल झाले होते सहाव्या दिवशी म्हाडाच्या अधिकाऱ्यांशी बोलणे झाल्यानंतर मुख्याधिकारी




विवेक कांदे यांनी मुंबईला जाण्याचे कबूल केल्याने सातव्या दिवशी उपोषण समाप्त करण्यात आले.मुख्याधिकारी विवेक कांदे यांनी उपोषण मंडपातून दि 4 रोजी म्हाडाच्या अधिकाऱ्यांशी बोलणे केले चारही डीपीआरचे तीन कोटी 67 लाख रुपये तात्काळ देण्याचे त्यांनी कबूल केल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची मंजुरी घेऊन मुख्याधिकाऱ्यांनी मुंबईला जाऊन ही रक्कम आणावी या अटीवर उपोषण समाप्त करण्यात आले यासोबतच झालेला भ्रष्टाचार महामार्गावर स्पीडब्रेकर तसेच प्रीपेड मीटर परवानगी शिवाय बसवू नये या मागणीलाही अधिकाऱ्यांनी मान्यता दिल्याने उपोषण सोडण्यात आले यावेळी लाभार्थ्यासह आनंद पाटील तूपदाळे पोलीस निरीक्षक देविदास चोपडे सहायक पोलीस निरीक्षक शरद घोडके कार्यालय अधीक्षक संदीप गजलवाड युवा व ग्रामीण पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार व्हाईस ऑफ मीडियाचे तालुका अध्यक्ष इलियास बावाणी जिल्हा उपाध्यक्ष विजय आमले जयकुमार अडकिने गणेश जाधव शेख रफिक गाईड समाधान कांबळे नवराष्ट्र माझाचे प्रतिनिधी अंबादास मुकटे व गोपाळ चव्हाण शेख मजहर सुरेंद्र पांडे पोका गजानन जाधव यांचे सह पत्रकार नागरीक लाभार्थी उपस्थित होते.

# चौल नाका येथे गटारात अडकला ट्रक; तनुजा घरत व टीम धावली मदतीला, सार्वजनिक बांधकाम विभागावर नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी** : रेवदंडा ते चौल नाका हा महत्त्वाचा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असला तरी दरवर्षी पावसाळा सुरू होताच विभागाच्या नियोजनशून्य आणि निष्काळजी कारभाराचे वास्तव समोर येत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. गटारे, लहान नाले आणि पावसाच्या पाण्याचा निचरा करणाऱ्या वाहिन्यांची वेळेवर साफसफाई न केल्यामुळे चौल नाक्यापासून बँक ऑफ महाराष्ट्र परिसरापर्यंत रस्त्यावर तब्बल चार ते पाच फूट पाणी साचत असल्याचे चित्र दरवर्षी पाहायला मिळते.

या पाण्याखाली गटारे आणि खोल खड्डे पूर्णपणे झाकले जात असल्याने वाहनचालकांना त्यांचा अंदाज येत नाही. परिणामी दुचाकीस्वार, रिक्षाचालक आणि चारचाकी वाहनधारकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार या मार्गावर दरवर्षी किमान १० ते १२ गंभीर अपघात घडत असून अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक दुचाकीस्वारांचे हात-पाय मोडले



असून काहींना गंभीर दुखापतींनाही सामोरे जावे लागले आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी गटारे व नाले स्वच्छ करण्याची जबाबदारी असताना सार्वजनिक बांधकाम विभाग दरवर्षी याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. अपघातानंतर पंचनामे होतात, तक्रारी होतात, संताप व्यक्त होतो; मात्र जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. "शेकडो नागरिकांचे हाल, लाखो रुपयांचे नुकसान आणि वारंवार होणारे अपघात याची जबाबदारी नेमकी कोण घेणार?" असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

दरम्यान, चौल नाका येथील बँक ऑफ महाराष्ट्रसमोर पावसाच्या पाण्याखाली झाकलेल्या गटारात एक मालवाहू ट्रक अडकला. ट्रकचे चाक गटारात घसरल्याने वाहतुकीची कोंडी निर्माण झाली. अखेर दोन जेसीबींच्या मदतीने मोठ्या प्रयत्नांनंतर ट्रक बाहेर काढण्यात आला. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.विशेष म्हणजे प्रशासन आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी उशिरा पोहोचत असताना सामाजिक बांधिलकी जपणारे काही स्थानिक कार्यकर्ते मात्र तत्काळ मदतीला धावून आले. सामाजिक कार्यकर्त्या तनुजा घरत, भूषण घरत, अंकित गुरव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी उपस्थित राहून मदतकार्य केले. अपघातग्रस्तांना मदत करणे, अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्यासाठी सहकार्य करणे आणि गरजू नागरिकांना शक्य ती मदत करणे हे कार्य ते सातत्याने करत असल्याने नागरिकांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

या प्रसंगी तनुजा घरत यांनी मदतकार्यात सहभागी झालेल्या सर्व नागरिक, जेसीबी चालक आणि सहकाऱ्यांचे आभार मानले. मात्र या घटनेने पुन्हा एकदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

रेवदंडा-चौल मार्गावरील पाणी साचण्याची समस्या ही नवीन नसून अनेक वर्षांपासून नागरिक तीच व्यथा मांडत आहेत. तरीही कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने शासन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला नागरिकांच्या जीवाची किंमत आहे की नाही, असा संतप्त सवाल परिसरातून उपस्थित केला जात आहे. एखादी मोठी जीवितहानी झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिक विचारत असून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून तातडीने कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

## हरित वारी': वसईत दुर्मिळ अजान वृक्ष व सुवर्णपिंपळाचे रोपण

# माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षाचे औचित्य; पालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंती वर्षाचे औचित्य आणि आपेगाव-पैठण येथून झालेल्या माऊलींच्या पालखीच्या पावन प्रस्थानाच्या निमित्ताने, वसई लगतच्या गंगेश्वर महादेव मंदिर परिसरात ६ जुलै सोमवार रोजी 'हरित वारी' उपक्रमांतर्गत अजान वृक्ष व सुवर्णपिंपळाचे रोपण करण्यात आले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे गती विधी पर्यावरण जिल्हा सह-कार्यवाह व वृक्ष-पर्यावरण संवर्धक डॉ. संतोष पाटील यांच्या 'हरित वारी' आणि लोकराज्य महाभियान अनुलोम (जालना-सिल्लोड विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम पार पडला.

यावेळी डॉ. संतोष पाटील यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, 'हरित वारी' उपक्रमाच्या माध्यमातून आतापर्यंत



हजारो दुर्मिळ वृक्षांची लागवड राज्यातील विविध मंदिरे, धार्मिक ठिकाणे आणि शिक्षण संस्थांमध्ये करून त्याचे संवर्धन केले जात आहे. या दोन्ही देववृक्षांच्या मूळ बीजांपासून स्वतः रोपनिर्मिती करण्याचा आमचा मानस आहे. वारकरी संप्रदायाचा वारसा जोपासण्यासाठी ही एक नितांत गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

याप्रसंगी संस्थानचे महंत भिकन महाराज, जगदीश कळात्रे, अंकुश सावळकर, गजानन मिरगे, डॉ. संतोष पाटील, सुनील गायकवाड, संजय मंदाडे आणि प्रकाश गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

**डॉ. संतोष पाटील यांनी सांगितलेले देववृक्षांचे महत्त्व**

डॉ. पाटील यांच्या माहितीनुसार, आळंदी येथील माऊलींच्या समाधीस्थळी ७०० वर्षांहून अधिक जुना 'अजान वृक्ष' आहे. तसेच, सुमारे २२०० वर्ष जुना पुरातन 'सुवर्णपिंपळ' असून, तो साक्षात कुबेराने लावला असल्याची धार्मिक धारणा आहे. माऊलींच्या माता रुक्मिणी देवी यांनी या सुवर्णपिंपळास सव्वा लक्ष प्रदक्षिणा घातल्या होत्या, तर याच वृक्षाच्या सानिध्यात माऊलींनी आपली ज्ञानसाधना केली आहे. आध्यात्मिक व पर्यावरणीय दृष्टीने हे दोन्ही वृक्ष अनन्यसाधारण आहेत.

# पनवेलमधील शतकपूर्तीचे पोस्ट ऑफिस जमीनदोस्त

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेलकरांच्या पत्त्याची आणि शहराच्या ओळखीची अविभाज्य खूण ठरलेली डॉ. पटवर्धन रोडवरील शंभर वर्षांहून अधिक जुनी पोस्ट ऑफिसची इमारत अखेर जमीनदोस्त करण्यात आली. धोकादायक घोषित झालेल्या या वास्तूच्या पाडकामामुळे अनेक पिढ्यांच्या आठवणी जपणारा इतिहासाचा एक साक्षीदार कायमचा काळाच्या पडद्याआड गेला.

स्थानिकांच्या मते, गेल्या सहा-सात दशकांपासून "जुन्या पोस्टाजवळ" हा केवळ पत्ता नव्हता, तर पनवेलची ओळख बनला होता. रस्ता सांगताना, भेटीचे ठिकाण निश्चित करताना किंवा पत्रव्यवहारातही या नावाचा हमखास उल्लेख होत असे. दगडी बांधकाम आणि कौलारू छप्पर असलेल्या या ऐतिहासिक वास्तूतून हजारो पत्रे, मनीऑर्डर आणि नोंदणीकृत टपालांची देवाणघेवाण झाली. नोकरीची पत्रे, परदेशातून आलेल्या आप्तांच्या चिठ्ठ्या, आनंदाच्या तसेच दुःखाच्या बातम्या याच पोस्ट ऑफिसमधून नागरिकांपर्यंत



**इतिहासाची आणखी एक खूण पुसल्याची नागरिकांची खंत; निवासी पत्त्यात बदल**

पोहोचत असत. 2025 मध्ये पोस्ट ऑफिसचे कामकाज विलासराव देशमुख शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये स्थलांतरित झाल्यानंतर ही इमारत वापराविना पडून होती.

कालांतराने ती धोकादायक ठरल्यानंतर अखेर तिचे पाडकाम करण्यात आले.

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पनवेल शहरातील जुन्या वास्तू एकामागोमाग नाहीशा होत असल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत. दोन वर्षांपूर्वी इमारत वादग्रस्त असल्याने जमीनमोजणी झाली होती. जुन्या वास्तूच्या जागेची मालकी हक्काची माहिती अद्याप स्पष्ट नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू आहेत. ओळखीच्या या खूणगाठेचे लुप्त होणे अनेकांना खटकत असून, जुन्या पनवेलचा वारसा जपण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शिवसेनेच्या (शिंदे गट) पुढाऱ्यांनी दिलेला शब्द पाळणार का? पिंपळा–जऊळका पांदण रस्ता अखेर होणार का?

**प्रचारसभेतील आश्वासनांची ग्रामस्थांकडून आठवण; दीड–दोन वर्षांनंतरही रस्ता रखडल्याने शेतकरी व कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी**

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे | जिल्हा प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान पिंपळा येथील श्री.मुंगसाजी माऊली मंदिर परिसरात झालेल्या सभेत शिवसेनेच्या स्थानिक पुढाऱ्याने ग्रामस्थांना दिलेल्या आश्वासनांची आता पुन्हा एकदा आठवण करून देण्यात येत आहे. त्या वेळी आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या उपस्थितीत गावातून मोठे मतदान मिळावे, यासाठी "ताई आधीच आमदार आहेत. त्या पुन्हा निवडून येतील किंवा नाही याची चिंता करू नका; मात्र गावातून मोठा लीड द्या. निवडणूक संपताच पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचा प्रश्न तातडीने मार्गी लावू. शासनाच्या निधीची वाट न पाहता आवश्यक असल्यास मुरूम किंवा खडी टाकूनही रस्ता सुरू करू," असा शब्द दिल्याचा दावा ग्रामस्थ व स्थानिक कार्यकर्ते करीत आहेत.या आश्वासनावर विश्वास ठेवून अनेक कार्यकर्त्यांनी गावोगावी पक्षासाठी मेहनत घेतली, मतदानासाठी जनजागृती केली आणि पक्षाला मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेतल्याचे सांगितले जात आहे. मात्र निवडणुकीला दीड ते दोन वर्षांचा कालावधी उलटूनही पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याच्या कामाला सुरुवात झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे.

सध्या या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून पावसाळ्यात चिखलामुळे शेतकऱ्यांना शेतीत जाणे कठीण झाले आहे. महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच शेतीमालाची वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेकदा वाहनांची ये-जा बंद होण्याची वेळ येत असल्याने ग्रामस्थांकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.ग्रामस्थांचे म्हणणे आहे की, प्रचारसभेदरम्यान शासनाच्या निधीचा प्रश्नच उपस्थित केला गेला नव्हता.



उलट निधीची प्रतीक्षा न करता स्थानिक पातळीवरूनही रस्ता सुरू करण्याचा शब्द देण्यात आला होता. मात्र आता संबंधित पुढाऱ्यांशी संपर्क साधल्यास "राज्यातच पांदण रस्त्यांसाठी निधी मंजूर झालेला नाही, निधी मिळाल्यानंतरच काम होईल," असे उत्तर दिले जात असल्याचा आरोप ग्रामस्थ करीत आहेत. त्यामुळे निवडणुकीपूर्वी दिलेली भूमिका आणि सध्याची भूमिका यात मोठा फरक असल्याची चर्चा गावात सुरू आहे.ग्रामीण भागात यामुळे शिवसेनेच्या स्थानिक नेतृत्वाबाबत नाराजी वाढत असल्याचे बोलले जात आहे. अनेक कार्यकर्त्यांमध्येही अस्वस्थता असून, निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी आता लोकप्रतिनिधींनी आणि पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने स्वतः लक्ष घालण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.ग्रामस्थांनी आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी स्वतः मतदारसंघात दौरा करून प्रलंबित प्रश्नांची पाहणी करावी, पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचे काम तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी आणि किमान मुरूम टाकून वाहतुकीची व्यवस्था त्वरित उपलब्ध करून द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अन्यथा आगामी पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये नागरिकांकडून तीव्र लोकक्षोभ निर्माण होऊ शकतो, अशी भावना गावकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

**'प्रचारसभेत शासनाच्या निधीची वाट पाहणार नसल्याचे सांगितले गेले होते. मग आता निधी नसल्याचे कारण का दिले जात आहे? दिलेला शब्द पाळून पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे. हा प्रश्न केवळ रस्त्याचा नसून शेतकऱ्यांच्या दैनंदिन जगण्याशी निगडित आहे,' अशी मागणी पिंपळा येथील ग्रामस्थ व स्थानिक कार्यकर्त्यांनी केली आहे.**

**वरिष्ठ नेतृत्वाने लक्ष घालण्याची मागणी पिंपळा–जऊळका पांदण रस्त्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करून नागरिकांचा विश्वास कायम ठेवण्यासाठी वरिष्ठ नेतृत्वाने जातीने लक्ष घालून तातडीने रस्त्याचे काम सुरू करावे, अशी मागणी शेतकरी, ग्रामस्थ आणि स्थानिक कार्यकर्त्यांकडून करण्यात येत आहे.**

# कर्जमुक्तीचा लाभ मिळेपर्यंत थकीत रकमेवर व्याज नाही !!

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** :राज्य शासनाच्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या संदर्भात सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने बुधवारी (१ जुलै रोजी) शासननिर्णय जारी केला आहे.

या संदर्भातील सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने बुधवारी (१ जुलै रोजी) शासननिर्णय जारी केला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने २ जून २०२६ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना मंजूर केली असून सध्या या योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेनुसार ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेल्या पात्र अल्पमुदतीच्या पीककर्जासाठी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी दिली जाणार आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर त्यांना एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतचा लाभ मिळणार असून, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची तरतूद आहे.

या योजनेसाठी शासनाने मानक कार्यपद्धती (एसओपी) तयार केली असून, जिल्हा मध्यवर्ती




सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांकडून पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करण्याचे काम सुरू आहे. त्यानंतर कर्जखात्यांची पडताळणी, अपात्र खात्यांचे वगळणे, लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण आणि कर्जमाफीची रक्कम संबंधित खात्यात जमा करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

ही प्रक्रिया सुरू असताना शेतकऱ्यांच्या थकीत पीककर्जावर व्याजाची वाढ होऊ नये आणि कर्जमाफीचा लाभ मिळाल्यानंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्यात अडथळे येऊ नयेत, यासाठी शासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कर्जमाफी आणि एकवेळ समझोता (ओटीएस) योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांच्या पात्र थकीत रकमेवर १ एप्रिल २०२६ पासून ते कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ खात्यात जमा होईपर्यंत कोणतेही व्याज आकारू नये, असे आदेश देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९-अ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी करण्यात आला असून, तो राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना लागू राहणार आहे.

# स्वर्गीय अजितदादा पवारांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने राज्यभरात दिनांक २२ ते २६ जुलै या कालावधीत 'जनसेवा सप्ताहा' चे आयोजन – सुनिल तटकरे

**● जनसेवा सप्ताहातून दादांचे समाजहिताचे विचार... लोकाभिमुख व जनसेवेप्रती असलेली परिणामकारक बांधिलकी जपली जाणार**

**● 'हरित महाराष्ट्र, वृक्ष माझी सावली, वृक्ष माझी माऊली, दादांची दृष्टी, हरित सृष्टी' ही थीम वापरत वृक्षारोपण मोहीम राबविली जाणार**

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** - स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने राज्यभरात दिनांक २२ ते २६ जुलै या कालावधीत 'जनसेवा सप्ताहा' चे आयोजन करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी दिली आहे.

अजितदादा म्हणजे अथक परिश्रम... दिलेला शब्द पाळणारे नेतृत्व... निर्णयक्षमता आणि जनतेसाठी अखंड झटणारे नेते... शेतकरी...कष्टकरी... महिला... युवक... विद्यार्थी यांना त्यांचा आधार होता... कृषी... सहकार... अर्थ... उद्योग... आरोग्य... शिक्षण... क्रीडा... पर्यावरण... पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास अशा प्रत्येक क्षेत्रात दादांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अथक प्रयत्न केले आहे.

जनसेवा सप्ताहाच्या निमित्ताने खालील उपक्रम राबविले जाणार आहेत. त्यामध्ये

**पर्यावरण संवर्धन विषयक उपक्रम**

आदरणीय दादांनी नेहमीच वृक्ष व पर्यावरण संवर्धनावर भर दिला होता. त्यामुळे प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा, आणि शाळा महाविद्यालये यामध्ये 'हरित महाराष्ट्र,वृक्ष माझी सावली, वृक्ष माझी माऊली,' 'दादांची दृष्टी, हरित सृष्टी,' अशा थीम अंतर्गत वृक्षारोपण मोहिम घेतली जाणार आहे. अजितदादांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री देवराई फाऊंडेशन या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात 'देवगिरी ते देवराई' हा वृक्षसंवर्धन उपक्रम राबवला जाणार आहे. याअंतर्गत प्रत्येक लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषद आजी - माजी सदस्यांनी आपापल्या मतदारसंघात प्रत्येकी एक देवगिरी ते देवराई उभारावी.

**आरोग्य विषयक उपक्रम**

राज्यव्यापी रक्तदान शिबीरे आयोजित करुन रक्तदान जनजागृती व रक्तसाठा वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न. ग्रामीण व शहरी भागात मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिरे, त्यामध्ये मधुमेह, रक्तदाब आणि डोळ्यांच्या तपासणी केल्या जाणार आहेत. महिलांसाठी स्तन कर्करोग, गर्भाशय कर्करोग तपासणी आणि सर्वांसाठी मुख कर्करोग तपासणी व समुपदेशन करावे. महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी ऑस्टीओपोरोसिसचे निदान शिबीरे आयोजित करण्यात आले आहे.

**सामाजिक उपक्रम**

अजितदादा शिस्तप्रिय व स्वच्छतेचे भोक्ते होतै. यामुळेच या जनसेवा सप्ताहात ठिकठिकाणी सार्वजनिक स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये गडकिल्ले, महापुरूषांची स्मारके, स्थळे, एसटी बस स्थानक आदी तर वारीसोबतच्या अजितदादांच्या स्मृती वारकऱ्यांच्याप्रती चिरंतन रहाव्यात यासाठी आषाढी वारीमध्ये वारकरी सेवा उपक्रम राबविला जाणार आहे.

**महिला सक्षमीकरण विषयक उपक्रम**

दादांच्या सामाजिक समावेशकतेच्या विचारधारेला प्रोत्साहन देणारे महिलांसाठी राज्यस्तरीय मेळावे, यामध्ये महिला बचत गट सक्षमीकरण, आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण आणि स्वयंरोजगार यावर चर्चा, संवाद व मार्गदर्शन कार्यक्रम, महिलांना सूक्ष्म कर्ज, कौशल्य प्रशिक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्वासाठी मार्गदर्शन, पक्षाच्या महिला आघाडी मार्फत अजितदादा महिला सशक्तिकरण पुरस्कार दिला जाणार आहे. शिवाय शेतकरी महिला सन्मानही केला जाणार आहे.

**कृषी विषयक उपक्रम**

जगातील नवीन व सर्वोत्तम तंत्रज्ञानाबाबत दादा माहिती घेऊन त्याचे प्रयोग शेतीत करायचे यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय' चा वापर करावा हा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे एआय तंत्रज्ञानावर आधारित कार्यशाळा, कृषी प्रदर्शने, शेतकरी समुपदेशन मेळावे, पीक पध्दती आणि बाजारभाव मार्गदर्शन व फलोत्पादन आणि फुलशेतीबाबत कार्यक्रम, प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी महिला व पुरुष यांना अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार देण्यात यावा.

**युवा संकल्प शिबिर**

अजितदादांच्या सामाजिक विचारधारेवर पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि नेतृत्वासाठी तयार करण्यासाठी राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या प्रमुख शहरांमध्ये युवा शिबिरे घेतली जाणार आहेत. शिवाय प्रमुख नेत्यांचा नेतृत्वाखाली कार्यशाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी युवांना प्रशिक्षण त्यामध्ये नेतृत्व कौशल्य, प्रचार रणनीती आणि मतदारांशी संवाद आदीचा समावेश असणार आहे. याशिवाय विविध क्रिडा प्रकारात नामांकित व उल्लेखनीय कामगिरी केलेल्या आजी-माजी खेळाडूंचा क्रीडा सन्मानाने गौरव व विविध खेळांचे आयोजन केले जाणार आहे.

**अल्पसंख्याक सेवा संकल्प**

अजितदादांनी अल्पसंख्याक समाजासाठी अनेक योजना आणि उपक्रम हाती घेतले होते अशा अनेक योजनांचा लाभ अल्पसंख्याक समाजाला मिळावा यासाठी सेवा संकल्प शिबिरे आयोजित केली जाणार आहे.

या जनसेवा सप्ताहाची जबाबदारी पालकमंत्री व संपर्कमंत्री यांच्यावर सोपविण्यात आली असून त्यांनी त्या- त्या ठिकाणी जाऊन जिल्हाध्यक्ष, फ्रंटल व सेलचे पदाधिकारी, तालुका व शहराध्यक्ष व प्रमुख पदाधिकारी यांच्या बैठका घ्यायच्या आहेत असेही खासदार सुनिल तटकरे यांनी काढलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

# गवळी समाज स्मशानभूमीसाठी पक्का रस्ता व मूलभूत सुविधांची मागणी; काँग्रेसचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**मुदखेड तिनिधी योगेश चौदंते :** मुदखेड शहरातील गवळी समाजाच्या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पक्का सिमेंट काँक्रीट रस्ता तसेच पिण्याचे पाणी, वीज, स्ट्रीट लाईट, बसण्यासाठी शेड आणि इतर मूलभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात, या मागणीसाठी मुदखेड काँग्रेस कमिटीच्या वतीने नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

मुदखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर परिसरातील गवळी समाजाची स्मशानभूमी लक्ष्मी-नारायण जिल्हा परिषद शाळेच्या उत्तर दिशेला असून, या स्मशानभूमीचा वापर समाजातील नागरिक अंत्यसंस्कारासाठी करतात. मात्र, आजपर्यंत स्मशानभूमीकडे जाण्यासाठी पक्का रस्ता नसल्याने अंत्ययात्रेदरम्यान नागरिकांना चिखल, पाणी आणि काटेरी झुडपांमधून मार्ग काढावा लागतो. ही परिस्थिती अत्यंत वेदनादायक असून मृत व्यक्तीच्या सन्मानालाही बाधा पोहोचवत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय स्मशानभूमी परिसरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वीज, स्ट्रीट लाईट, बसण्यासाठी शेड, स्वच्छता तसेच इतर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने अंत्यविधीच्या वेळी नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून ही समस्या कायम असून वारंवार लक्ष वेधूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याची खंतही व्यक्त करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर गवळी समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणारा पक्का सिमेंट काँक्रीट रस्ता तसेच सर्व आवश्यक मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी काँग्रेसच्या शिष्टमंडळाने मुख्याधिकाऱ्यांकडे केली. तसेच या निवेदनाची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा ३० दिवसांच्या आत कोणतीही कार्यवाही न झाल्यास गवळी समाजाच्या न्याय्य मागण्यांसाठी नगर परिषद कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ माजी नगरसेवक गंगाधर डांगे, युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष मुजीबभाई पठाण, नगरसेवक खदीरभाई, संजय बोकेफोड, अविनाश चौदंते, जिल्हा काँग्रेसचे सचिव गिरीश कोत्तावार, सेवा दलाचे तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे, युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष वेदांत शेवटे, शिवानंद देवके, रमेश बोडके, विठ्ठल आचार्य, गजानन संबोड, सुभाष चौदंते, बालाजी गुळेवाड, मोईनभाई फुलवाले, राजरत्न शिरसागर, शेख अनिस शेख शरीफ यांच्यासह मुदखेड काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गवळी समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हजारो कोटींचा 'मिसिंग लिंक'... पण जबाबदारीची लिंक कुठे हरवली?

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दिपक कोळवणकर प्रतिनिधी** : मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील 'मिसिंग लिंक' प्रकल्प हा महाराष्ट्राच्या अभियांत्रिकी क्षमतेचे प्रतीक म्हणून सादर करण्यात आला. हजारो कोटी रुपये खर्च, अत्याधुनिक बोगदे, उंच केबल-स्टेड पूल आणि वेगवान प्रवासाची स्वप्ने नागरिकांना दाखवण्यात आली. मात्र, पहिल्याच पावसाळ्यात भूस्खलन, रस्त्यावरील दोष आणि वाहतुकीतील अडथळ्यांनी या प्रकल्पाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण केले आहेत.

सरकारला काही सरळ प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

जर प्रकल्प पूर्णपणे सुरक्षित होता, तर पहिल्याच पावसात अशी परिस्थिती का निर्माण झाली?

गुणवत्ता तपासणी नेमकी कुणी केली?




त्या अहवालाची माहिती जनतेसमोर का ठेवली जात नाही?

काम पूर्ण झाल्यानंतरही दोष आढळत असतील, तर त्याची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी कोण स्वीकारणार?

करदात्यांच्या हजारो कोटी रुपयांचा वापर करून उभारलेले प्रकल्प इतके नाजूक असतील, तर सामान्य नागरिकांनी सरकारी आश्वासनांवर किती विश्वास ठेवायचा?

प्रकल्पाचे उद्घाटन करण्याची घाई होती, की गुणवत्तेची खात्री करण्याची? नागरिकांना आकर्षक उद्घाटने नकोत; त्यांना सुरक्षित, टिकाऊ आणि विश्वासार्ह पायाभूत सुविधा हव्यात.

सरकारने या प्रकरणाची स्वतंत्र तांत्रिक चौकशी जाहीर करावी, संबंधित अधिकाऱ्यांची आणि ठेकेदारांची जबाबदारी निश्चित करावी, तसेच संपूर्ण चौकशी अहवाल जनतेसमोर सादर करावा. सार्वजनिक पैशाचा प्रत्येक रुपया हा जनतेचा आहे; त्यामुळे उत्तरदायित्वही जनतेपुढेच असले पाहिजे.

प्रश्न फक्त 'मिसिंग लिंक'चा नाही; प्रश्न शासनाच्या उत्तरदायित्वाचा आहे. जर जबाबदारीच हरवली, तर विकासाच्या दाव्यांवर जनतेने विश्वास ठेवायचा तरी कशाच्या आधारावर?

# हाळदा येथील शेतकऱ्याची कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना हाळदा शिवारात रविवार (दि. ५) रोजी दुपारी एकच्या सुमारास आढळून आली. गणेश भावराव गवळे (वय ४६) असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.



याबाबत मिळालेली माहिती अशी की, मयत शेतकरी गणेश गवळे यांची गट क्र. १७६ मध्ये हाळदा शिवारात जमीन आहे. सकाळी साडेदहाच्या सुमारास शेतात जाऊन येतो असे घरी सांगून ते शेतात गेले. सध्या परिसरात शेतीची कामे सुरू आहेत. त्यांच्याच शेतातील मोहाच्या झाडाला मयत गणेश गवळे हे लटकलेल्या अवस्थेत दुपारी एकच्या सुमारास शेतकऱ्यांना आढळून आले.

सदरची माहिती अजिंठा पोलिसांना देण्यात आली. मृताचे अजिंठा ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यावर खाजगी बँकेचे कर्ज होते, तसेच शेतीसाठी कर्ज मिळावे यासाठी त्यांनी बँकेत चकराही मारल्या. आर्थिक विवंचनेतून शेतकऱ्याने टोकाचे पाऊल उचलल्याचे कुटुंबाकडून सांगण्यात आले. मृत शेतकऱ्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार आहे.

या प्रकरणी अजिंठा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. बीट जमादार दिलीप तडवी, पोकॉ. रवींद्र बागुलकर तपास करत आहेत.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत इम्पॅनलमेंटच्या 650 फाईली प्रलंबित; प्रक्रिया रखडल्याने रुग्णांना फटका

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी** : मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेअंतर्गत राज्यातील विविध रुग्णालयांच्या इम्पॅनलमेंटसाठी (Empanelment) सादर करण्यात आलेल्या सुमारे 650 फाईली ऑडिट पूर्ण होऊनही अद्याप मंजुरीच्या प्रतीक्षेत असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे पात्र रुग्णालयांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांनाही योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याची चर्चा आरोग्य क्षेत्रात सुरू आहे.




माहितीनुसार, इम्पॅनलमेंटसाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांवरील अंतिम निर्णय अद्याप झालेला नसल्याने अनेक रुग्णालयांना गेल्या अनेक महिन्यांपासून मंजुरीची प्रतीक्षा करावी लागत आहे. परिणामी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेअंतर्गत उपचार घेऊ इच्छिणाऱ्या गरजू रुग्णांना वेळेत आर्थिक मदत मिळण्यास अडचणी निर्माण होत असल्याचे सांगितले जात आहे.

राज्यातील अनेक रुग्णालयांनी आवश्यक कागदपत्रांसह नियमांनुसार प्रस्ताव सादर केले असतानाही प्रक्रिया संथ गतीने सुरू असल्याची तक्रार संबंधितांकडून व्यक्त होत आहे. यामुळे उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीवर अवलंबून असलेल्या रुग्णांचे हाल होत असल्याचे चित्र आहे.

आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत आहे की, ऑडिट पूर्ण झालेल्या पात्र रुग्णालयांच्या इम्पॅनलमेंट प्रस्तावांवर तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. यामुळे गरजू रुग्णांना वेळेत उपचाराचा लाभ मिळेल आणि रुग्णालयांनाही मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजनेअंतर्गत सेवा देणे शक्य होईल.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष आणि संबंधित प्रशासनाने प्रलंबित फाईलींचा लवकरात लवकर निपटारा करून प्रक्रियेत पारदर्शकता राखावी तसेच पात्र रुग्णालयांना न्याय देत गरजू रुग्णांना वेळेत उपचाराचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

**ठळक मुद्दे**

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतील इम्पॅनलमेंटच्या सुमारे 650 फाईली प्रलंबित.

ऑडिट पूर्ण होऊनही अंतिम मंजुरीला विलंब.

पात्र रुग्णालये अनेक महिन्यांपासून प्रतीक्षेत.

गरजू रुग्णांना वेळेत उपचार व आर्थिक मदत मिळण्यात अडचणी.

प्रलंबित प्रस्तावांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी.

# इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या विविध योजना !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे प्रतिनिधी** : राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळातर्फे इमाव प्रवर्गासाठी अनेक योजना राबवल्या जात आहेत. महामंडळाचे अकोल्यातील कार्यालय निमवाडीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवनात आहे.

**वीस टक्के बीजभांडवल योजना**

ही योजना राष्ट्रीयकृत बँकेमार्फत राबवली जाते. महामंडळाचा सहभाग २० टक्के, लाभार्थ्यांचा पाच टक्के आणि बँकेची ७५ टक्के सहभाग असतो. महत्तम प्रकल्प मर्यादा ५ लक्ष रू. आहे. अर्जदाराचे वय १८ ते ५० हवे.

महत्तम कर्ज मर्यादा १ लक्ष, शेतीला पूरक किंवा छोट्या व्यवसायासाठी अर्ज मिळते.परतफेडीचा काळ ५ वर्ष. नियमित फेडल्यास व्याज नाही. थकित हप्त्यांवर वार्षिक ४ टक्के व्याज. कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रू. व अर्जदाराचे वय १८ ते ५५ हवे.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना**

गरजू कुशल व्यक्तींना नवीन व्यवसाय सुरु करण्यासाठी तसेच व्यवसाय वृद्धीसाठी ही योजना राज्यातील राष्ट्रीयीकृत बँकेमार्फत तसेच सरकारी बँकेमार्फत राबवली जाते. व्यवसायासाठी मागणीनुसार १ ते १० लक्ष रू. पर्यंत रक्कम बँकेमार्फत देण्यात येते.

बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत १२ टक्क्यांपर्यंत व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरूपात लाभार्थीला मिळते. लाभार्थीने कर्जासाठी ऑनलाइन अर्ज महामंडळाच्या संकेतस्थळावर अर्ज करावा. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लक्षपर्यंत असावे. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्ष असावे.

उच्च शिक्षणाकरिता देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय अभ्याक्रमासाठी प्रवेश घेण्याकरिता रु. १० ते २० लक्ष इतके महत्तम कर्ज बँकेमार्फत दिले जाते, बँकेचे कर्ज नियमित परतफेड केल्यास महामंडळामार्फत १२ टक्क्यांपर्यंत व्याज परतावा रक्कम अनुदान स्वरुपात लाभार्थीला देण्यात येते. या कर्जासाठी अर्हता अशी की, अर्जदार इयत्ता बारावीत ६० टक्के व अधिक गुणांनी उत्तीर्ण असावा. अर्जदाराचे वय १७ ते ३० असावे. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लक्ष पर्यंत असावे.

इतर मागासवर्गीय प्रवर्गातील गरीब व होतकरू महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी राज्यातील बचत गटातील उत्पादित केलेल्या वस्तूंचे उत्पादन प्रक्रिया व मूल्य आधारित उद्योगांकरिता बैंकमार्फत मंजूर करण्यात आलेल्या रु. ५ ते १० लक्ष पर्यंतच्या कर्ज रक्कमेवरील १२ टक्के व्याज परतावा उपलब्ध करून देण्यात येते. ही योजना महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत लोकसंचालित साधन केंद्राच्या सहाय्याने राबविण्यात येते.

या योजनेचा लाभ घेणारी महिला इतर मागास प्रवर्गातील व महाराष्ट्राची रहिवाशी असावी, त्यांचे वय १८ ते ६० वर्ष असावे.बचत गटाची नोंदणी महिला विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधन केंद्रात केलेली असावी, असे आवाहन महामंडळाच्या सहायक संचालकांनी केले.

## आ. बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त धामणगाव रेल्वेत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन



**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी सचिन ठाकूर** धामणगाव रेल्वे : शिवसेनेचे विदर्भ नेते, विधान परिषद सदस्य तथा माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त धामणगाव रेल्वे येथे शिवसेना व प्रहार जनशक्ती पक्षाच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार, दि. 5 जुलै 2026 रोजी सकाळी 10 वाजता श्री महालक्ष्मी अग्रो, साईनगर, धामणगाव रेल्वे येथे हा उपक्रम पार पडणार आहे. "रक्तदान हेच श्रेष्ठदान" या संदेशातून अधिकाधिक शिवसैनिक, पदाधिकारी व नागरिकांनी रक्तदान करून या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या रक्तदान शिबिराचे आयोजन प्रवीणभाऊ हेंडवे (संपर्कप्रमुख, यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली, प्रहार जनशक्ती पक्ष), निलेश तिवारी (शिवसेना तालुका प्रमुख, धामणगाव रेल्वे), योगेशभाऊ थाळे (शिवसेना शहर प्रमुख), सुरज गंथडे (प्रहार तालुका अध्यक्ष) आणि शुभम ठाकरे (युवासेना तालुका प्रमुख) यांच्या पुढाकाराने करण्यात आले आहे.

कार्यक्रमस्थळी सहभागींसाठी स्नेहभोजनाचीही व्यवस्था करण्यात आली असून, समस्त शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहून अनावश्यक प्रवास टाळावा

## संपूर्ण शासकीय यंत्रणा अलर्ट मोडवर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्यातील अतिवृष्टी आणि बदलत्या नैसर्गिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाची संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगून अनावश्यक प्रवास टाळावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

विधानसभेत राज्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या परिस्थिती बाबत माहिती देताना मुख्यमंत्री बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री म्हणाले की, हवामानातील बदलामुळे निर्माण होणाऱ्या अतिवृष्टी, दरडी कोसळणे आणि जोरदार वाऱ्यासारख्या घटना या निसर्गाच्या बदललेल्या चक्राचा भाग आहेत. अशा परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी शासनाने पूर्वतयारी केली असली तरी काही वेळा अपेक्षेपेक्षा वेगळ्या घटना घडतात. मात्र अशा प्रत्येक परिस्थितीत महानगरपालिका, राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि संबंधित सर्व विभाग रस्त्यावर उतरून तातडीने मदतकार्य करत आहेत.

**नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य**

नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत धोकादायक ठिकाणी त्वरित वाहतूक वळविणे, रस्ते बंद करून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देणे, अडकलेल्या नागरिकांना सुरक्षित परत आणणे तसेच पाण्यात अडकलेल्या वाहनांना बाहेर काढण्यासाठी मदतकार्य सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

मुख्यमंत्री यांनी सांगितले की, संभाव्य धोका लक्षात घेऊन गेल्या दोन दिवसांत धोकादायक भागांतील नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरित करण्यात आले असून त्यांच्या निवासाचीही व्यवस्था करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, आजचा दिवस अत्यंत महत्त्वाचा असून दुपारनंतर राज्यातील काही भागांत जोरदार वारे आणि मुसळधार पावसाचा इशारा आहे. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, शक्यतो प्रवास टाळावा आणि कोणत्याही परिस्थितीत अनावश्यक बाहेर पडू नये.

विशेषतः तरुणांना आवाहन करताना मुख्यमंत्री म्हणाले की, पावसाळी पर्यटन, धबधबे, घाट परिसर किंवा धोकादायक ठिकाणी फिरण्यासाठी जाणे पूर्णपणे टाळावे. सध्याची परिस्थिती लक्षात घेता सुरक्षिततेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.

मुख्यमंत्री यांनी सांगितले की, राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून असून नियमित आढावा घेतला जात आहे. सर्व जिल्हा प्रशासनांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही ठिकाणी यंत्रणेत कमतरता राहणार नाही आणि आवश्यक त्या सर्व उपाययोजना तातडीने करण्यात येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

तसेच, गेल्या दोन-तीन दिवसांतील घटनांबाबत, करण्यात आलेल्या मदतकार्याबाबत आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत सविस्तर निवेदन उद्या सादर करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले.

# महाराष्ट्र राज्यस्तरीय गो गेम प्रशिक्षण शिबिराचा समारोप उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : गो गेम असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय गो गेम प्रशिक्षण शिबिराचा समारोप समारंभ रविवारी (दि. ५ जुलै २०२६) उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हे प्रशिक्षण शिबिर दि. ३ ते ५ जुलै दरम्यान आयोजित करण्यात आले होते.




समारोप समारंभास विभागीय उपअधिकारी योगेश मोरे, मुख्य प्रशिक्षक करण रावत, गो गेम असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष अशोक दुधारे, उपाध्यक्ष दीपक निकम, छत्रपती पुरस्कार विजेते राजू शिंदे, गो गेम असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे सचिव अविनाश वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून प्रशिक्षणासाठी सहभागी झालेल्या प्रशिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी गो गेम असोसिएशन ऑफ महाराष्ट्र चे अध्यक्ष अशोक दुधारे यांनी उपस्थित प्रशिक्षकांना संबोधित करताना आपल्या-आपल्या जिल्ह्यात गो गेमचा प्रचार व प्रसार करण्याचे तसेच आगामी राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये अधिकाधिक खेळाडूंचा सहभाग नोंदविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे योगेश मोरे यांनी गो गेमच्या विकासासाठी भविष्यात आवश्यक ते सहकार्य करण्याची ग्वाही देत प्रशिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. उपाध्यक्ष दीपक निकम यांनी गो गेमच्या इतिहासाची माहिती देत महाराष्ट्रभर या खेळाच्या प्रसारासाठी असोसिएशन सर्वतोपरी सहकार्य करेल, असा विश्वास व्यक्त केला.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल आहिरे यांनी केले. उपस्थित मान्यवर, प्रशिक्षक आणि खेळाडू यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे समारोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. सतिष बोरा यांनी कार्यक्रमाची आभार करत कार्यक्रमाची सांगता केली

# पनवेल–धोधाणीत दुर्दैवी घटना ! वाघाची वाडी नदीत पोहताना 2 तरुण गेले वाहून

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसादरम्यान पनवेल तालुक्यातील धोधाणी परिसरात रविवारी एक दुर्दैवी घटना घडली आहे. वाघाची वाडी येथील नदीपात्रात पोहत असताना 2 तरुण पाण्याच्या प्रचंड प्रवाहात वाहून गेले.नयन म्हात्रे आणि सुमित पवार अशी या 2 तरुणांची नावे असून सुमारे 10 जणांचा ग्रुप या नदी परिसरात मौजमजा करण्यासाठी गेले होते. बुडालेले दोघेही तरुण विचुंबे गावातील रहिवासी होते. मुसळधार पावसामुळे वाघाची वाडी परिसरातील नदी दुथडी भरून वाहत असताना ही दुर्घटना घडली. यावेळी इतर मित्रांनी अथक प्रयत्न करत सुमित यशवंत पवार याला पाण्याबाहेर काढले. त्याला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

दरम्यान, नयन म्हात्रे हा तरुण अद्याप बेपत्ता असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलीस आणि बचाव पथकांकडून प्रयत्न सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र, सतत सुरू असलेला मुसळधार पाऊस



आणि नदीपात्रातील वाढलेला पाण्याचा प्रवाह यामुळे शोधकार्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत.धोधानीचे पोलीस पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, बेपत्ता तरुणाचा शोध घेण्यासाठी बचावकार्य युद्धपातळीवर सुरू असून पुढील कार्यवाही पोलीस आणि बचाव पथकांकडून करण्यात येत आहे. या दुर्दैवी घटनेमुळे विचुंबे गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान, पावसाळ्यात नद्या, ओढे आणि धबधब्यांमधील पाण्याचा प्रवाह क्षणार्धात वाढू शकतो. त्यामुळे नागरिक व पर्यटकांनी अशा ठिकाणी जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन सातत्याने करून देखील तरुण जीव गमावत असल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

# लायन्स क्लब धामणगाव रेल्वे तर्फे उत्साहात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**तालुका प्रतिनिधी सचिन ठाकूर धामणगाव रेल्वे** --पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत लायन्स क्लब, धामणगाव रेल्वे यांच्या वतीने जे.बी. पार्क ते मंगरूळ फाटा परिसरात आज ५ जुलै रविवार रोजी सकाळी साडेदहा वाजता भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश देत विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमाला नगरपरिषद चे बांधकाम समिती सभापती मंजिरी अतुल भोगे यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. मंजिरी अतुल भोगे त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान



एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. लायन्स क्लबचे अध्यक्ष विशाल पनपालीया, सचिव मनोज मुंधडा, कोषाध्यक्ष प्रफुल पोळे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. प्रकल्प प्रमुख संजय वर्मा व मुस्तफा बोहरा यांनी कार्यक्रमाचे नियोजन व समन्वयाची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडली. यावेळी लायन्स क्लबचे पदाधिकारी, सदस्य, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारत वृक्ष लागवडीबरोबरच त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि घटत चाललेले हरित क्षेत्र लक्षात घेता अशा प्रकारचे उपक्रम काळाची गरज असल्याचे मत लायन्स क्लबचे अध्यक्ष विशाल पनपालीया यांनी व्यक्त केले. लायन्स क्लबच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत करत भविष्यातही अशाच सामाजिक व पर्यावरणविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळवाटप व प्रबोधनपर पुस्तकांचे वितरण

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी** : लोकनायक, शेतकरी पुत्र, दिव्यांग हृदयसम्राट तथा माजी मंत्री बच्चूभाऊ कडू यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय, पालांदूर (चौ) येथे समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले, तसेच आरोग्य अधिकारी, कर्मचारी आणि प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांना प्रबोधनकार ठाकरे लिखित देवळांचे



धर्म आणि धर्माची देवळे तसेच ज्योतीराव फुले लिखित गुलामगिरी आणि शेतकऱ्यांचा आसूड ही प्रबोधनपर पुस्तके भेट देण्यात आली.

या उपक्रमाचा उद्देश समाजात वाचन संस्कृतीला चालना देणे, सामाजिक प्रबोधनाचा संदेश देणे आणि रुग्णसेवेबरोबरच वैचारिक जागृती घडवून आणणे हा होता.

यावेळी प्रहार संघटनेचे भंडारा जिल्हा उपाध्यक्ष तथा रुग्णमित्र जयेंद्र देशपांडे, जितेनभाऊ कुंभरे, हितेशभाऊ पडोळे, प्रकाश बांते महाराज, गिरीधारी नागेश्वर महाराज, विलासभाऊ शेंडे, हेमराज गोटफोडे, दुलीचंद निंबार्ते, मा. मखरे, वैद्यकीय अधिकारी तसेच रुग्णालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी बच्चूभाऊ कडू यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत समाजहिताच्या अशा उपक्रमांचे स्वागत केले.

# ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली रिसोड पोलिसांची आणखी एक उल्लेखनीय कामगिरी !

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : रिसोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली रिसोड पोलिसांनी आणखी एक उल्लेखनीय कामगिरी करत घरफोडीच्या गुन्ह्याचा अल्पावधीत छडा लावला आहे. शेतकऱ्याच्या घरातून चोरीस गेलेले ९ क्विंटल सोयाबीन व तूर असा ६९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करत तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे. तत्पर तपास, गोपनीय माहितीचे अचूक संकलन आणि नियोजनबद्ध कारवाईमुळे हा गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले असून, या कारवाईचे परिसरात कौतुक होत आहे.

हराळ (ता. रिसोड) येथील शेतकरी



अजिंक्य विलास खरे (वय ३०) यांनी २९ जून २०२६ रोजी रिसोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. फिर्यादी घरी नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि घरातील खोलीत ठेवलेले सोयाबीनचे ७ पोते व तुरीची २ पोती, असा एकूण ९ क्विंटल शेतमाल चोरी करून नेला होता. या तक्रारीवरून रिसोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी तपासाची सूत्रे स्वतःकडे ठेवत विशेष पथकाला आवश्यक सूचना दिल्या. गोपनीय माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा शोध घेत गजानन कुंडलिक सरकटे, अमोल माणिक सरकटे आणि दिपक नामदेव सरकटे (रा. हराळ, ता. रिसोड) यांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीत तिघांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेले

## शेतकऱ्याचे चोरीस गेलेले ९ क्विंटल सोयाबीन व तूर जप्त; ६९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत, तीन आरोपी जेरबंद

रिसोड पोलिसांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर काहीच दिवसांत गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींना जेरबंद करत चोरीस गेलेला संपूर्ण शेतमाल जप्त केला. ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या प्रभावी नियोजन, काटेकोर तपास आणि पोलिसांच्या समन्वित कारवाईमुळे गुन्ह्याचा जलद उलगडा झाला. या यशस्वी कारवाईमुळे शेतकऱ्याला मोठा आर्थिक दिलासा मिळाला असून, रिसोड पोलिसांच्या कार्यक्षमतेचे नागरिकांकडून कौतुक केले जात आहे.

सोयाबीनचे ७ पोते व तुरीची २ पोती, असा ६९ हजार ५०० रुपयांचा संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी पदभार स्वीकारल्यानंतर मालमत्तेविषयक गुन्ह्यांचा वेगाने तपास, अवैध धंद्यांवर कारवाई तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सातत्याने प्रभावी पावले उचलली आहेत. या कारवाईमुळे गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक निर्माण झाला असून, सर्वसामान्य नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक निखेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गणेश सूर्यवंशी, सचिन गोखले, पोहेका संतोष अवाळे, आशीष पाठक, प्रशांत राजगुरू, रुपेश मसके, अमोल हांके, प्रविण गोपनारायण आणि परमेश्वर भोणे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# पाणीच पाणी चहूकडे ! मिरा-भाईंदर पावसाच्या विळख्यात, जनजीवन विस्कळीत

**दैनिक युवक आधार**

**ठाणे प्रतिनिधी - बाळकृष्ण परब :** मिरा-भाईंदर शहरावर गेल्या दोन दिवसांपासून पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. रविवारी रात्रीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने सोमवारीही विश्रांती न घेतल्याने शहरातील अनेक भाग जलमय झाले. सखल वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे हजारो नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असून, वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांना नद्यांचे स्वरूप आले असून, घरांमध्ये आणि व्यावसायिक आस्थापनांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

सर्वाधिक फटका मिरागाव, काशीमिरा, पेणकरपाडा, नयानगर, भाईंदर पश्चिम, उत्तन परिसरातील सखल भागांना बसला. पहाटेपासूनच अनेक भागांमध्ये गुडघाभर ते कंबरभर पाणी साचल्याने नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले.

सततच्या पावसामुळे अनेक सोसायट्यांच्या तळमजल्यावरील फ्लॅट, दुकाने आणि कार्यालयांमध्ये पाणी घुसले. घरगुती साहित्य, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि व्यावसायिक मालाचे नुकसान झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. काही ठिकाणी पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या वाहनांमध्येही पाणी शिरल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले.

मुसळधार पावसासोबतच ताशी ५० ते ८० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या प्रचंड वाऱ्यांनीही मिरा-भाईंदरकरांची चिंता वाढवली आहे. अनेक ठिकाणी झाडांच्या फांद्या तुटून पडल्या, तर काही ठिकाणी मोठी झाडे उन्मळून पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण झाला. जोरदार वाऱ्यामुळे होर्डिंग्ज, पत्र्यांची शेड, बांधकामावरील सुरक्षा जाळ्या आणि तात्पुरती संरचना हादरल्या. काही भागांत खबरदारीचा उपाय म्हणून वीजपुरवठा तात्पुरता खंडित करण्यात आला. मुसळधार पाऊस आणि वेगवान वाऱ्याच्या दुहेरी तडाख्यामुळे शहरातील जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुसळधार पाऊस, जलसाच्याची गंभीर परिस्थिती आणि अतिवेगवान वाऱ्याच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत शासनाने मुंबई महानगर प्रदेशातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे. हवामान विभागाने दिलेल्या 'रेड अलर्ट'च्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक संस्थांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने नागरिकांना अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये तसेच पावसाचा जोर ओसरेपर्यंत सुरक्षित ठिकाणीच राहण्याचा सल्ला दिला आहे.

रस्त्यांवरील जलसाच्याचा थेट परिणाम वाहतुकीवर झाला. मिरा रोड, भाईंदर, काशीमिरा आणि घोडबंदरकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. पश्चिम द्रुतगती महामार्गावरही संथ वाहतूक सुरू होती. कार्यालयीन वेळेत हजारो नोकरदारांना तासन्तास वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागले.

दरम्यान, भारतीय हवामान विभागाने (IMD) मुंबई महानगर प्रदेशासाठी 'रेड अलर्ट' जारी केला असून पुढील २४ तास अतिमुसळधार पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. ताशी ७० ते ९० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज वर्तविण्यात आल्याने समुद्रकिनारी आणि सखल भागात विशेष सतर्कता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मिरा-भाईंदर महानगरपालिका, अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन पथके युद्धपातळीवर कार्यरत असून, पाणी साचलेल्या भागांमध्ये उच्च क्षमतेचे पंप बसवून निचरा करण्याचे काम सुरू आहे. धोकादायक ठिकाणी बॅरिकेड्स उभारण्यात आले असून नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्याचे कामही सुरू आहे. नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवण्यात आला असून आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करत अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, पाण्याखाली गेलेल्या रस्त्यांवरून प्रवास टाळावा, विद्युत खांब व उघड्या विद्युत तारा यांच्यापासून दूर राहावे, तसेच अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरवर्षी पावसाळ्यात मिरा-भाईंदरमधील काही भागांमध्ये पाणी साचण्याची समस्या पुन्हा पुन्हा समोर येत असल्याने नागरिकांनी पावसाच्या पाण्याचा निचरा, सांडपाणी व्यवस्था, रस्त्यांची उंची आणि पायाभूत सुविधांच्या नियोजनाबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी राबविण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

सध्या पावसाचा जोर कायम असून पुढील काही तास अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहेत. परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष असून नागरिकांनी सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पालोद: ज्येष्ठ नागरिक वामन पालोदकर यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**पालोद (ता. सिल्लोड)** : येथील ज्येष्ठ नागरिक वामन कडुबा पालोदकर (वय ७२) यांचे रविवारी (दि. ५) दुःखद निधन झाले. स्वभावाने निगर्वी आणि प्रेमळ व्यक्तिमत्व म्हणून ते परिसरात परिचित होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच पालोद परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कै. वामन पालोदकर यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले - कृष्णा पालोदकर व नवनाथ पालोदकर, तीन मुली, सुना व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवारी रात्री ९:३० वाजता पालोद येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सावरी –मुरमाडी–लाखनी रोडलगतच्या नाल्या गाळाने तुडुंब; प्रशासनाचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**



**रोशन खोब्रागडे लाखनी :** सावरी–मुरमाडी–लाखनी मार्गालगत असलेल्या सुमारे ९० टक्के नाल्या गाळ, माती व कचऱ्याने भरून गेल्या आहेत. पावसाळ्याची सुरुवात होऊनही या नाल्यांची अद्याप साफसफाई करण्यात आलेली नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सावरी, मुरमाडी आणि लाखनी परिसरातील मोठ्या प्रमाणातील पावसाचे पाणी याच नाल्यांमधून वाहून जाते. मात्र नाल्यांची क्षमता गाळामुळे कमी झाल्याने मुसळधार पाऊस झाल्यास पाणी रस्त्यावर तसेच आसपासच्या वस्त्यांमध्ये साचण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा, नागरिकांना त्रास आणि आरोग्याच्या समस्या उद्भवण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सामाजिक कार्यकर्ता संतोष ऊकणकर यांच्या म्हणण्यानुसार, पावसाळ्यापूर्वी नाल्यांची साफसफाई करणे आवश्यक असतानाही संबंधित प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे. वेळेत उपाययोजना न केल्यास परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. संबंधित विभागाने तातडीने नाल्यांची साफसफाई करून पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत करण्याची मागणी त्यांनी केली आहे. अन्यथा पावसाळ्यात उद्भवणाऱ्या संभाव्य स्थितीची जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा इशाराही दिला आहे

## कुंभार समाजाच्या विकासासाठी शासन कटिबद्ध

- **पारंपरिक कुंभार व्यवसाय व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रासाठी ५ एकर जागा देणार**
- **महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची राज्यव्यापी कृतज्ञता मेळाव्यात घोषणा**

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** : कुंभार समाजाच्या मताधिक्यामुळेच आम्हाला जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे समाजाच्या हिताचा आणि सर्वांगीण विकासाचा विचार करूनच शासन निर्णय घेत आहे. कुंभार समाजाच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्या पूर्ण करण्याची संधी मिळणे हे आमचे भाग्य असून, समाजाचे ऋण फेडण्याचा हा आमचा प्रामाणिक प्रयत्न आहे," असे प्रतिपादन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

सकल कुंभार समाज विकास परिषदेतर्फे रेशीमबाग येथील महात्मा ज्योतिराव फुले सभागृहात आयोजित राज्यव्यापी कृतज्ञता मेळाव्यात सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

यावेळी त्यांनी कुंभार समाजाच्या विकासासाठी अनेक महत्त्वपूर्ण घोषणा केल्या. संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला बोर्ड तातडीने कार्यान्वित करणे, ग्रामीण भागातील कुंभार व्यावसायिकांना माफक दरात इंधन उपलब्ध करून देणे, संत गोरोबा काका यांच्या जन्मस्थळ तेर तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करणे, कुंभार महिला बचत गटांना पारंपरिक व्यवसायासाठी अडीच गुंठे जागा व एक लाख रुपयांचे भांडवली अनुदान उपलब्ध करून देणे, तसेच नागपूर महानगरपालिका क्षेत्रासह राज्यातील सर्व जिल्ह्यांत पारंपरिक कुंभार व्यवसाय व कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रासाठी ५ एकर जागा उपलब्ध करून देण्यात येईल, अशी घोषणा त्यांनी केली.



शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनीही कुंभार समाजाच्या विविध मागण्यांचा सातत्याने पाठपुरावा करून त्या मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.प्रास्ताविकात सकल कुंभार समाज विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संजय यांनी भारतीय कला, संस्कृती आणि परंपरेचे जतन करणारा कुंभार समाज आज विविध समस्यांनी ग्रासला असल्याचे सांगितले. शासनाच्या दुर्लक्षामुळे पारंपरिक कुंभार कला आणि व्यवसायाचा ऱ्हास होत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कुंभार समाजासाठी लागू असलेले कालबाह्य व जाचक अटींचे शासकीय परिपत्रक रद्द करून त्याऐवजी सुलभ, सर्वसमावेशक व समाजहिताचे नवीन परिपत्रक जारी केल्यामुळे पारंपरिक कुंभार व्यवसायाला नवी ऊर्जा मिळाली आहे. त्याबद्दल सकल कुंभार समाज विकास परिषदेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

यावेळी भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, माजी आमदार सुधाकर कोहळे, तसेच विविध जिल्ह्यांतील कुंभार समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष चंदनलाल प्रजापती यांनी केले, तर सरचिटणीस सुभाष तेटवार यांनी आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रमाला प्रामुख्याने राज्यस्तरीय संघटनाचे रमाकांत क्षीरसागर, संजय जोरले, मोहन जगदाळे, सुरेश पाठक, दत्ता डाळजकर, श्याम राजे, सुधाकर शेंडोकार, विजय देवडे, रसिका खेडकर, राजीव खरे, गोपाल बनकर, हरिश्चंद्र सावरकर, ॲड श्रीधर काळकर, आकाश हारोडे, गंगाधर पोडल्लीवार, दसरथ प्रजापती, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ओमप्रकाश पांडे, रमेश बुरबादे, बबलू जुगले, किसन गाते, दिनेश कुकडे, योगेश आमगे, अनिल धनोरे, उद्धव चौधरी, तुषार पाठक प्रविण गाते, गोविंदा कपाट, सुनील कोलूरवार राजेश चिकाणे, वैभव व्यवहारे योगेश प्रजापती, ममता प्रजापती, चंद्रकला चिकाने, अनिता काशीकर, रेखा राने, सुशीला वझे, सरला चिकाणे, भारती प्रजापती, पुष्पा ठाकरे, एकता कैथे, मयुरी प्रजापती यांनी अथक प्रयत्न परिश्रम घेतले.

## भारतातही फुटबॉल संस्कृती रुजायला हवी !

फुटबॉल हा जगातील सर्वाधिक लोकप्रिय खेळ मानला जातो. जगातील जवळपास प्रत्येक देशात हा खेळ खेळला जात असल्याने त्याला खेळांचा राजा असेही म्हटले जाते. या खेळाचा सर्वात मोठा आणि प्रतिष्ठेचा सोहळा म्हणजे फिफा विश्वचषक. फुटबॉलप्रेमींसाठी हा स्पर्धा महोत्सव म्हणजे अक्षरशः कुंभमेळाच. यंदाचा २०२६ चा विश्वचषक अमेरिका, कॅनडा आणि मेक्सिको या तीन देशांनी संयुक्तपणे आयोजित केला असून प्रथमच ४८ संघांच्या सहभागामुळे स्पर्धेचे स्वरूप अधिक व्यापक आणि रोमांचक झाले आहे.

यापूर्वी विश्वचषकात ३२ संघ सहभागी होत असत. मात्र यंदापासून ४८ संघांचा समावेश करण्यात आला आहे. १२ गटांमध्ये विभागलेल्या या स्पर्धेत प्रत्येक गटातील अव्वल दोन संघांसह सर्वोत्तम आठ तिसऱ्या क्रमांकाच्या संघांनाही बाद फेरीत प्रवेश मिळत आहे. त्यामुळे अधिक देशांना जागतिक स्तरावर स्वतःचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळाली आहे.

यंदाच्या विश्वचषकात अनेक धक्कादायक निकाल पाहायला मिळाले. बलाढ्य संघांना अनपेक्षित पराभव पत्करावा लागला, तर काही नवोदित संघांनी आपल्या खेळाने जगाला चकित केले. त्यापैकी सर्वाधिक चर्चेत राहिला तो आफ्रिकेतील छोटासा केप वर्दे देश. अवघी सुमारे सहा लाख लोकसंख्या असलेल्या या देशाने प्रथमच विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आणि बाद फेरीपर्यंत मजल मारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अर्जेंटिनाविरुद्ध अखेरच्या क्षणी गोल स्वीकारल्यामुळे त्यांचा प्रवास थांबला; पण त्यांनी फुटबॉलप्रेमींची मने जिंकली. आकाराने लहान असला तरी जिद्द, शिस्त आणि सांघिक खेळाच्या बळावर जगात स्वतःचे स्थान निर्माण करता येते, हे केप वर्देने सिद्ध करून दाखवले.

एका बाजूला केप वर्देसारखा छोटा देश जागतिक फुटबॉलमध्ये उल्लेखनीय कामगिरी करतो, तर दुसऱ्या बाजूला तब्बल १४५ कोटी लोकसंख्या असलेला भारत अजूनही विश्वचषकापासून दूर आहे. एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या देशाला जागतिक फुटबॉलमध्ये ठोस स्थान निर्माण करता आलेले नाही, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. प्रतिभेची कमतरता नसतानाही नियोजन, पायाभूत सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि तळागाळातील विकास यामध्ये आपण मागे पडत आहोत.

भारतात क्रिकेटला मिळणारी लोकप्रियता आणि सुविधा इतर खेळांना मिळत नाहीत, हे वास्तव आहे. फुटबॉलची परंपरा पश्चिम बंगाल, केरळ, गोवा आणि ईशान्येकडील काही राज्यांपुरतीच मर्यादित राहिली आहे. अनेक ठिकाणी दर्जेदार मैदाने, प्रशिक्षक, प्रशिक्षण केंद्रे आणि स्पर्धांचा अभाव आहे. त्यामुळे अनेक गुणवान खेळाडूंना स्वतःची क्षमता सिद्ध करण्याची संधीच मिळत नाही.

भारतात फुटबॉल संस्कृती रुजवायची असेल तर केवळ व्यावसायिक लीग पुरेशा ठरणार नाहीत. शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावर फुटबॉलला प्रोत्साहन देणे, प्रत्येक जिल्ह्यात दर्जेदार मैदाने उभारणे, प्रशिक्षित प्रशिक्षक उपलब्ध करून देणे, नियमित स्पर्धांचे आयोजन करणे आणि ग्रामीण भागातील प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळवून देणे आवश्यक आहे. माध्यमांनीही फुटबॉलला अधिक प्रसिद्धी दिल्यास आणि आंतरराष्ट्रीय सामन्यांचे व्यापक प्रक्षेपण झाल्यास तरुण पिढी या खेळाकडे अधिक आकर्षित होईल.

भारताकडे प्रतिभा, युवा शक्ती आणि संसाधनांची कमतरता नाही. गरज आहे ती दीर्घकालीन नियोजनाची, सातत्यपूर्ण गुंतवणुकीची आणि फुटबॉलला लोकचळवळीचे स्वरूप देण्याची. क्रिकेटप्रमाणेच फुटबॉललाही देशभरात पोषक वातावरण निर्माण झाले, तर भारताचाही तिरंगा एक दिवस फिफा विश्वचषकाच्या मैदानावर अभिमानाने फडकताना पाहण्याचे स्वप्न निश्चितच साकार होऊ शकते.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड, जि. पुणे**

## दादर येथील रस्त्यावर रामरक्षा पठण

**दैनिक युवक आधार मुंबई**

**प्रतिनिधी:- मयुर धुरी :** आज दादर येथील श्री पुरातन वटवृक्ष ट्रस्ट चे हनुमान मंदिरात अयोध्येतील श्रीराम मंदिरातील कथित आर्थिक गैरव्यवहाराच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातर्फे रामरक्षा पठण व महाआरती ती आयोजन करण्यात आले.यावेळी उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सह इतर नेते सुद्धा सहभागी झाले.





श्रीरामाच्या नावाने उभारलेल्या मंदिराशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार तसेच अनेक चुकीचा गोष्टी यांच्या मुळे कोट्यवधी रामभक्तांच्या श्रद्धेला ठेच पोहोचली आहे ,

श्रद्धेच्या नावाखाली झालेल्या कोणत्याही गैरप्रकाराची सखोल, निःपक्षपाती व पारदर्शक चौकशी होऊन सत्य जनतेसमोर यावे, हीच प्रत्येक रामभक्ताची अपेक्षा आहे. असे यावेळी

उद्धव ठाकरे यांच्या कडून संबोधण्यात आले या प्रकरणाचा निष्पक्ष तपास होईपर्यंत लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आणि सर्व हिंदू समाजाला जागरूक राहण्याचे आवाहन केले.